ISSN No. 2454-8731 MONTHLY PEER REVIEWED JOURNAL

# Rankranti Multidisciplinary Research Journal




*Chief Editor*
**Dr. Umesh B. Pujari**

*Executive Editor*
**Dr.. Amit H. Raut**

# Rankranti Multidisciplinary Research Journal

Rankranti Multidisciplinary Research Journal

ISSN No. 2454-8731

*Chief Editor*
**Dr. Umesh B. Pujari**

*Executive Editor*
**Dr.. Amit H. Raut**

PRESIDENT OF EDITORIAL BOARD & REVIEW COMMITTEE

**Dr. Saheb Khandare**

**Practitioners of folklore and abstract culture**

| Guidance | Guidance |
|---|---|
| **Dr. Narendra Deshmukh** | **Dr. H. J. Narke** |
| **S. P. Pune Univrsity, Pune** | **Principal, V.P.S.P's Art, Commerce & Science College, Kannad Aurangabad** |

**EDITORIAL BODY**

| | |
|---|---|
| **Dr. Pramod Padwal**<br>Banras Hindu Univarsity, Varansi<br>Uttar Pradesh | **Dr. Sanjay Karndikar**<br>**The Maharaja Sayajirao University of Baroda, Baroda, Gujrat** |
| **Dr. Sneha S. Mahambre**<br>**Government College, Sankhli, Goa** | **Dr. Taher Pathan**<br>**Alighar Muslim University Alighar, Uttar Pradesh** |
| **Dr. Manik Chavan**<br>**Gulbarga University, Kulbargi - 585106, Karnataka** | **Dr. Manisha S. Nesarkar**<br>Rani Chennamma Univerisy Belgavi Karantka |
| **Dr. Vitthal H. Jambale**<br>**Swami Ramanand Teerth Marathwada. University, Nanded, Dist. Nanded** | **Dr. Z. A .Pathan**<br>**Art's, Comm. & Science College, Badnaprur Dist. Jalna** |

| | |
|---|---|
| **Dr. Prashant Sonvne**<br>KBC North Maharashtra University, Jalgoan, Maharashta | **Dr. Lalit Adhane**<br>Muktanand Mhavidyalay,Gangagapur Dist. Aurangabad |
| **Prin. Dr. Dada Markad**<br>**Shri Harihareshwar Art's & Science College, Koradgoan, Tq. Pathardi, Dist. Ahamadnagar** | **Principal. Dr. Chandu K. Poptkar**<br>Kumbhalkar College of Social-work, Wardha Tq. & Dist. Wardha |
| **Dr. Kalidas M. Bhange**<br>A. B. Mahavidyalay Devgoan Rangari, Aurangabad | **Dr. Milind B. Bachute**<br>**R.C.Patel College Shirpur, Dist. Dhule** |

REVIEW COMMITTEE

| | |
|---|---|
| **Dr. Ramchandra M. Bhise**<br>**Digmbar Bindu** Mahavidyalay, Bhokar S. **R.T.M. U. N., Dist. Nanded** | **Dr. Sharad Meshram**<br>S. S. Jaiswal College Arjuni-Morgoan Gondia Dist. Gondia |
| **Dr. Maroti Tegampre**<br>Godawri Arts Jr. & Sr. College, Ambad Dist. Jalna | **Asst. Prof. S. P. Gutte**<br>Shivaji College Kandhar, Tq. Kandhar Dist. Nanded |
| **Dr. M.R. Kadam**<br>Shivaji College Kandhar, Tq. Kandhar Dist. Nanded | **Dr. N. V. Singapure**<br>**Sharda College, Parbhani, Dist. Parbhani** |
| **Dr. Ganesh V. Lokhande**<br>R. B. O. Narayanrao Borake College, Shrirampur, Dist. Ahamadnagar | **Dr. Umakant S. Gaikwad**<br>Art's & Science College Chincholi, (Li) Tq. Kannad, Dist. Aurangabad |

# अनुक्रमणिका


| अ.क. | संशोधन विषय | लेखकाचे नाव | पान क. |
|---|---|---|---|
| 1 | जुल्फी शेख यांची कविता : एक चर्चा | डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज | 01 -10 |
| 2 | "आधुनिक भारतीय आरमाराचे जनक : छत्रपती शिवाजी महाराज " | सिंधू निव्रर्ती लोणकर | 11 - 14 |
| 3 | धनंजय कीर यांचे चरित्र लेखनातील मा. ज्योतिबा फुले यांचे स्त्री सबलीकरणातील भूमिका | श्री शातलवार आर,एस.<br>डॉ पिंपळपल्ले आर. आर. | 15 - 18 |
| 4 | छत्रपती शाहू महाराजांना व वेदोक्त प्रकरण | प्रा.डॉ.पिंपळपल्ले आर.आर. | 19 - 21 |
| 5 | हैदराबाद मुक्ती लढ्यात मराठवाड्यातील क्रन्तिकारी महिलांचे योगदान | हक्के रेणुका प्रकाशराव | 22 - 26 |
| 6 | भारतीय स्वतंत्र क्रांतिकारी स्त्रियाचे योगदान | जाधव किरण विलास | 27 - 28 |
| 7 | भारतीय मतदारांचे वर्तन प्रभावित करणारा घटक: जात | प्रा. डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे | 29 - 34 |
| 8 | तज्ञ डेटाबेस आिा राष्ट्रीय संशोधकांचे नेटवर्क | शंखपाळे ज्योती रमेश | 35 - 37 |
| 9 | 1942 च्या आंदोलनातील खडकीच्या महिलांची भूमिका | प्रा. डॉ. चंद्रशेखर शिरसागर | 38 - 40 |


**टिप** – मागील काही अंकासाठी पुरेसे लेख न आल्यामुळे ऑगस्ट नंतर आत्ताच म्हणजे जानेवारी 2021 चा अंक प्रकाशित करित आहोत तरी सर्वांनी याची नोंद घ्यावी.


वरील संशोधन पत्रिकेतील सर्व लेखन किंवा मतांशी प्रकाशक, मुद्रक, संपादक, संपादक समिती सदस्य आणि प्रकाशनांच्या सर्व समितीचे सर्व सदस्य सहमत असतील असे नाही. वरील संशोधन लेखाची जबाबदारी ही त्या - त्या लेखकांची असेल. जर कुणाला प्रकाशनाची काही हरकत असेल तर त्यांची न्यायालयीन कार्यक्षेत्र नांदेड असेल.

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

# जुल्फी शेख यांची कविता : एक चर्चा

**डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज**
मराठी विभाग प्रमुख
एस.एस.गर्ल्स कॉलेज, गोंदिया.(महाराष्ट्र)
अंसारी वार्ड, विठ्ठल नगर, गोंदिया 441601

**प्रस्तावना :–**

सय्यद अमीन यांनी 1935 मध्ये प्रथमतः मुस्लिम मराठी साहित्य हे संबोधन मराठी भाषिक मुस्लिम धर्मीय साहित्येकांच्या साहित्याला दिले आणि एक समृध्द असा प्रवाह मराठी साहित्यात जन्माला आला. कथा, कादंबरी, नाटक, वैचारिक लेखन या लेखनासह सर्वात जास्त लेखन काव्यक्षेत्रात झाले. अजीज नदाफ, कवी अमरशेख, एतबार खान पठाण, युसुफ सारंग, बदिउज्जमा खॉवर, अजीज नदाफ, नसिमा पठाण, खलील मोमीन, इलाही जमादार, अे.के. शेख, फ.म.शहाजिंदे, शिराज मुजावर, इकबाल मुकादम, जहीर शेख, एहतेशाम देशमुख, शेख आयुब, बादशहा सय्यद, एस.एन.पठाण, शब्बीर मुलाणी, मिर्जा रफी बेग, कलीम खान, इब्राहिम खान, शेख इकबाल मिन्ने, जब्बार पटेल, अजीम नवाज राही, मुबारक शेख, बदिउज्जमा बिराजदार, जावेद कुरैशी, ऐजाज जोश, मुजफ्फर सैय्यद, शफीक शेख, सय्यद अल्लाउद्दीन, रब्बानी शेख, डी.के. शेख, कलाम अहमद खान, मिर्जा बिलोलीकर, शफी बोल्डेकर, हबीब भंडारे, साहित्य अकादमी प्राप्त इरफान शेख इत्यादी कवींसोबत फातिमा मुजावर, नसिमा पठाण, मलिका अमरशेख आणि डॉ.जुल्फी शेख या कवयित्रींनी भरभरून काव्यलेखन केले आहे. मुस्लिम कवींच्या कवितेबद्दल फकरूद्दीन बेन्नूर म्हणतात, ''कविता लेखनाचा प्रारंभ हा एक प्रकारे त्यांच्या अभिव्यक्तीचा नवा अविष्कार असल्यामुळे त्यांचे स्वरूप, अनुकरणात्मकच मोठया प्रमाणावर आहे. सत्तरीनंतरच्या मराठी मुक्त छंदाचा प्रभाव त्यांच्यावर मोठया प्रमाणावर आढळून येतो.''

अशाच सत्तरीनंतरच्या मुस्लिम मराठी कवितेमध्ये डॉ.जुल्फी शेख यांच्या कवितांचे वेगळेपण नजरेत भरण्यासारखे आहे. आतापर्यंत जुल्फी शेख यांचे 'अक्षरवेध', मी कोण ? आणि 'अजून गाठी शिलकीत' असे तिन काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून 'मधुशाला' हा हरीवंशराय बच्चन यांच्या मधुशालेचे मराठी भाषांतर होय. याशिवाय 'नवे प्रवाह नवे स्वरूप' हे पुस्तक प्रकाशित झालेले आहे ? तसेच 'उर्दू गालिबे गज़ल आणि पत्रानुवार' हा अभ्यासग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहे. गोंदिया शिक्षण संस्थेच्या भंडारा जिल्हयातील रेवाबेन पटेल महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून त्या निवृत्त झाल्या. जुल्फी यांचा जन्म 7 जुलै 1957 ला पूर्वविदर्भातील निसर्गरम्य अशा ग्रामीण भागात भंडारा जिल्हयातील गर्भश्रीमंत घराण्यात झाला, सासरही तशाच प्रकारचे. महत्वाचे म्हणजे जुल्फी शेख यांचे पती डॉ. तालीब शेख यांनी दहावी शिकलेल्या आपल्या पत्नीला उच्चशिक्षण घ्यायला लावून त्यांच्या सर्वागिण विकासाचा मार्ग मोकळा केला. या मोकळयामार्गाचा भरपूर लाभ घेऊन आपल्या व्यक्तिमत्वाला पांरपांरिक व चौकटीबध्द आकारेपक्षा वेगळा आणि व्यापक असा आकार दिला. म्हणूनच मराठी विद्वानांच्या पंक्तीत, बसण्याचे मान त्यांना सहज मिळाले. 'मुंतोजी ब्राम्हणी' या मुस्लिम संताच्या वेदान्तावर आचार्य ही पदवी प्राप्त केली. तसेच श्री ज्ञानदेवांचा वाङःमधीन वारसा (मृत्यूजंय हयांच्या विशेष संदर्भासहीत) या विषयावर डी. लीट प्राप्त केली. डॉ.जुल्फी शेख हया संपन्न व्यक्तिमत्वाच्या धनी आहेत. पुण्यातील अ.भा.मुस्लीम मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष्या राहिलेल्या आहेत.

**'अक्षरवेध' अक्षरवेधीमन :–** अक्षरवेध हा कवयित्रीचा पहिला काव्यसंग्रह असून पद्मभूषण प्राप्त अभिनेते श्री दिलीप कुमार यांच्या हस्ते प्रकाशित झालेला आहे. या काव्यसंग्रहात एकूण 52 कविता असून हा काव्यसंग्रह जीवनाच्या पावलोपावली साथ देणाऱ्या, शिक्षणाचा, विकासाच्या वाटेने सहजीवन जगणाऱ्या पतीला म्हणजे डॉ. तालीख शेख यांना अर्पण केला आहे.

"आयुष्यभर जडले प्रेम जीवनाशी रमते जीवना साद दे मजशी

उन्मादला सुंगध अवतरली सांजपिशी विखुरतो खेळ सारीपटाचा अंतिमाशी"

अशा वैवाहिक जीवनातील सोबती, त्याच्यासह जीवन जगताना सुरक्षितता, प्रेम, नवी नवलाई, स्वप्नपूर्तीचा आनंद अशा अनेक अनुभूती, त्यातून भरभरून मिळणारे आश्वासन या काव्यसंग्रहातील कवितातून व्यक्त झाले आहे. प्रेमभावनेसोबतच आपल्या परिसरातील निसर्गाचे, महापुरूषांचे आदर्श, स्त्रीजीवनातील मनाचा कोंडमारा, स्वतःच्या जीवनातील आनंदासोबतच स्त्री वर्गाच्या जीवनाची वेदनाही व्यक्त झाली आहे.

"चुलबंदी कुशीवर माझ्या वाडयाचे खंडहर

पूर्वेस उभी मशिद पश्चिमेश वसे मंदिर

तरी सुप्रभाती उठती हाका भुकेल्या ताटत्याच्या

किलबील पोरांची सूर रडवेल्या मानवाचे ......

विलीन व्हाया थरथरती चुलबंदी काठ होती आतुर .....

आजही पाणी झुळझुळ वाहते गाव दरिद्री व्यथागीत गाते

कोण देईल यांना क्षुधाशमन वीणा वाहती चुलबंद आहे दीनवाणी"

आपल्या जन्मभूमीचा निसर्ग आणि मानवी जीवन कवयित्रीला वेडं करतो. नैसर्गिक आपत्ती आणि गरीबीमुळे हवालदिल झालेला समाजाप्रती कवयित्रीची वेदना व्यक्त होते. स्त्रीजीवनाला मुक्तपणे जीवन जगण्याची मुभा समाज देत नाही, ती दयायला हवी, मानवी जीवनाला काळीमा आणणारी बंधने स्त्रीवर घालू नये हे सांगताना कवयित्री म्हणतात.

"कुंपन' मुकी घालू नकोस, हिरवळीला वाढू दे भरघोस

दुर्बोध गोत्र असे लाभावे लयींचे एकेक रंग शोधता यावे

पण स्वप्नांना नको आहेतर अगातिकतेचे

प्रसाद बहाल कर तुझ्या अस्तित्वांचा"

एक स्त्रीला माणूस म्हणून जगता येइल एवढे स्वातंत्र्य दयायलाच हवे, समाजातील स्त्रीचे दुय्यमत्व, त्यातून तिच्यावर कुंटुबाच्या जबाबदाऱ्या, मातृत्वाच्या वलयातून निर्माण झालेली अनेक बंधने, हयांचे संस्कार अगदी बालपणापासूनच मुलीवंर होत असतात.

नव्हे जन्मची गतपरंपरे दिलेस ऋण

रूजण्यास जणी तू अर्पिलीस आण, पारंपरी धडयाचे गिरविले,

"किले असे गिरविण्यातच आयुष्याची साठ वर्षे संपून जातात आणि मनातल्या निरगाठी न सुटताच जीवन संपून जाते. समाजाने स्त्रीचे पंख कापले पण त्या पंखाचे प्रसवणे कापता येत नाही. आईने मुलीला जगण्याचे बळ दयावे, स्वतःसारखे परंपरेच्या साच्यात बंदिस्त करू नये. नाही तर "शब्द संपले, बंध संपले, संपले

सर्वकाही, चांदण्यांच्या पेरणींना, रूसणे देता आलेच नाही.'' अशा अवस्थेत पिढयान्‌पिढया निघून जातील. अशा पिढयान्‌पिढया बदलण्याकरीताच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात स्त्रींयाकरीता समान अधिकार दिले आहेत. मानवतेचा माणूसकीचा समाज धागा जपणाराच नव्हे तर हक्काने उपभोगणारा कायदाच मिळाला आहे.

''एक दिवाणे विमुक्त गाणे दिलेस तू गाया
चांदणे पिण्या मन अधिरले
समतिर्थाचे प्राशन करण्या जनमेघ धतित्रीमय झाले.
पूर्वसुरींची घडी विस्कडून शापिततेचा अर्थ बदलूनी
क्रांत पर्वाची धुसर जाळी तू दिलीस उजळ करा.''

नवथर वेड ही कविता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाचा वेध घेऊन संस्कृतीतील पूर्वसूरींची घडी विस्कटून, प्रस्थापितांच्या समाजव्यवस्थेला हलवून, स्त्रियापर्यंत, दलितांपर्यंत मूलभूत आणि मानवी हक्क पोहचवण्याच्या कार्याची महती व्यक्त करते. हे कार्य म्हणजे माणूसकीचा, मानवतेचा उत्सव असून यामुळे संपूर्ण मानवी समूह अखंड अशा समाजात बांधता जाईल असा आशावाद व्यक्त झाला आहे.

याशिवाय मिरा, राधा–कृष्ण यांचा प्रभाव, मराठी भाषेबद्दलची अनावर अशी ओढ आणि गोडी, चुलबंदी बोल, नागपूरी बोली, अपभ्रंश भाषा, भंडारी भाषा, वऱ्हाडी बोली यांची अपूर्वाइ कवीत्वाची ओढ ''नको खय्यामची रूबाई इवलिशी खेळणी व्हावी उतराई, ''हिंदू परंपरेची ओढ कुंकुम, गोंदण, जीवनाचे निर्माल्य रूप, जीवनातील अनेक संघर्ष, अंतर्मनातील वेदना या सर्वांना कवयित्रीने कवितारूप दिले आहे. ''वर्षाव कोसळून आळवू कसे मी, माझ्या प्रगत पथांना लावू कसे मलम, मी या पोळत्या सुखांना बांधू कशा मी चिंद्या, माझ्या दोन्ही करांना जगणे अशक्य झाले, माझ्या शिक्षित मनाला'' एकदंरीत ही वेदना कवयित्रीने या काव्यसंग्रहात व्यक्त केली आहे. पहिल्या–वहिल्या कविता असूनही कवयित्रीच्या सक्षमतेची ग्वाही या कविता देतात म्हणून कवी ग्रेस आपल्या पत्रात्मक अभिप्रायात म्हणतात, ''एक अमराठी परधर्मीय विदयार्थिनीच्या ठिकाणी असलेले मराठी भाषेचे आणि मराठी काव्याचे अस्सल प्रेम पाहून त्यावेळी मी चकित झालो होतो. साधा सरळ अनुभव वेचक शब्दांनी व्यक्त करण्याची त्यांची शैली वेधक तर आहेच पण त्याबरोबरच अनुरवाचा आत्मभान जपताना त्यांची आपल्या कवितेला समकालीन कृत्रिम शब्दावडबरांपासून फार नेकीने दूर ठेवले आहे. यातूनच त्यांच्या आत्मविश्वासाची जशी साक्ष पटते तद्वतच त्यांच्या भविष्यातील विकासांचेही आश्वासन मिळते.'' अक्षरवेध हा काव्यसंग्रह अनुभवल्यानंतर ग्रेस यांच्या विधानाची सार्थकता लक्षात येते.

**मी कोण ? :–** 2001 ला प्रकाशित झालेला मी कोण ? या दुसऱ्या काव्यसंग्रहात एकूण 71 कविता असून मानवी जीवनाच्या विशेषतः स्त्री जीवनाच्या व्यापक जगाचे आणि त्या जगातील स्व अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या प्रश्नांचे निर्मिती स्वरूप म्हणजे मी कोण ? होय. विविध प्रश्नांची निर्मिती आणि त्यांच्या विविधांगी उकल करण्याच्या आशयभिव्यक्तीने या काव्यसंग्रहाची मांडणी झाली आहे. स्वत्व शोधणारी पहिलीच कविता

मी कोण ? मी भेसूर विसंगती
मी कोण ? मी एक पडका शेवाळलेला खंडहर की, शापित भिंत ?
मी कोण ? Line of control - loc ...

मी कोण ? मी सीमा रेखा – मी अशी शापित

'रिट का चिराग न रहे' सारखी .....

मी कोण ? मी शिया, मी सुन्नी, मी हिंदु, मी अहिंदू

पाक–नापाक, पवित्र–अपवित्र, हिंदू–सिंध कोण ? ......

मी कोण ? मी फाळणी ?

विदुषकांनी तसे माझे नामकरण केले आहे.

अतिसंवेदनशीलतेने स्वःचा शोध घेत असता धर्म, समाज, राष्ट्र, साहित्य, मानवता, आध्यात्मिकता, आधुनिकता व शेवटी राष्ट्रप्रेम अशा सर्व घटकासंह मी कोण ? हा प्रश्न उभा आहे. भारत पाकीस्तान फाळणीमुळे हिंदू–मुस्लिम मनात द्वेष निर्माण झाला पण मी तर अस्सल भारतीय आहे. शिया, सुन्नी, हिंदू, अहिंदू, पवित्र, अपवित्र, कवितेतील प्रतिमा की वेदना, अपेक्षित की उपेक्षित, नैसर्गिक जन्मलेलं मूल, की क्लोन बेबी, देश सोडून जावं लागणाऱ्या अभाग्यांच्या कथेंतील कथूली की जिन्हाचे वारस की भारतातील स्वतंत्र नागरिक, काहीच ठरवता येत नसले तरी भारत देश माझ्या प्रेमाचा भक्तीच देश आहे हे मात्र खरे. संपूर्ण जीवनाचा आशय या ओळींमध्ये येतो. मुस्लिम म्हणून, स्त्री म्हणून, कवी म्हणून जो भावनिक संघर्ष वाटयाला येतो त्यात कवीमन अधिकच हळवे होते आणि लेखनी सृजन करत जाते. हे सृजनच 'मी सांगते मी आहे – भरल्या पुरल्या दिशा आखणारी राणी' असे सांगते पण तरीही "सजल पापण्यावरी एक सत्य श्रांत आहे, सल ही युगायुगाची मन मुलखात आहे" स्त्री असून वेद पुराण वाचले, पुराणप्रबंध लिहले पण जात आणि लिंगाच्या भेदभावाने सतत टिकेचा विषयच बनत गेलेल्या कवयित्रीला आपलं कुठं चुकतं हेच कळत नाही. ईश्वर किवा पैगंबर यांच्यावर निढळ श्रध्दा ठेवून जगत असता आपल्या समाजाची हलाखिची स्थिती, सर्वकाही अल्लावर सोपवून जगणारे त्याच्या संदेशाला समजत नाहीत, स्विकारत नाही, 'तुम रोजी तलाश करो मै दुंगा' हे मुख्य तत्वज्ञानच अल्ला भक्त विसरतात. त्यामुळे शिक्षणाचा प्रचार, प्रसार होत असतानाही लाथाडलेल्या जगात जगणे मुस्लिम समाजाच्या नशिबी आहे.

मी कोण या काव्यसंग्रहाचा अभ्यास करताना लक्षात येते की या काव्यसंग्रहातील कविता विविधांगी आहेत. सामाजिक, राजकीय, स्त्रीवादी, प्रेम, विचारात्मकता, आधुनिकता या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या आशयगर्भ कविता विद्रोहाचा विशिष्ट वैचारिक दृष्टिकोन देतात. सामाजिक वेद पुराण, मर्जी, अलिफ बे, मनसल्या, विसरावे नाव बारा, ॲनस्थेसिया, इमान, कायम प्रोफेशनल टॅक्स, काळभान–वेळभान, प्रदुषण या सामाजिक कवितांमधून भारतीय समाजातील अनेक दोष स्थले दाखवून त्यातील सुधारणा सूचवत जगणं कीती भयाण आहे हे दाखवत हे जगणं सुखद करता येईल हा आशावाद व्यक्त केला आहे.

डोळे त्यांना दृष्टी दे वाणी त्यांना विवेक दे

दिलीस तर एक सतत, प्रक्रियेची असा दे

परिवर्तनाच्या वेदीवर टांगून ठेव

मुक्त केलेस तर पाय ठेवायला हक्काचे अधिकाराचे दे ठावठिकाण"

वैचारिक दृष्टीकोन समाजात बळावला तर समाज सतत बदलत राहून अंधश्रध्दा, बुरसटलेल्या विचारांना नष्ट करेल आणि स्वतःचा विकास करेल, मुस्लिम समाजही परिवर्तनाच्या वाटेवर जाऊन धर्मश्रध्दाळू जीवन

जगायचा प्रयत्न करेल तेव्हा त्यांना हक्काचे घर मिळाले पाहिजे. नाहीतर अल्लाच्या मर्जीच्या नावावर जगणारा समाज पुढे जाणार नाही.

''तर कधी भेटतात रूसजलेल्या मोमीनपुऱ्यांच्या बोळात,
टिनटप्परीत पानठेल्यावर विडे लावीत पिचकाऱ्यांच्या शर्यतीत
ठिगळ पाठीवर शिव्या ओठावर अन् पान जिभेवर
गांजा, अफिम हिरोईनचे दिलेले लेबल विलसतात माथ्यावर दिसतात
कधी लुंग्या लावून शायरी करीत
चिपाडभरल्या वेषात भेटत असतात लाथाडलेल्या बेवारशी जमात
ट्रकचे स्टेयरिंग हातात घेवून डांबरी रस्त्यावर सरपटत
शिक्षणाच्या नावाने असते नेमकी तेवढी ट्रकची नेमप्लेट तोंडपाठ''

अशा हलाखिच्या अवस्थेत जगत असलेल्या मुस्लिम समाजाने शिक्षण घेऊन स्वतःचा विकास करवून घ्यावा, धर्माच्या नावावर मागासलेपणात राहू नये अन्यथा पिढयान्पिढया खितपत राहतील. अशा समाजातील स्त्रियांची स्थिती अधिकच खालावलेली आहे त्यांना शिक्षणाचा गंधच नाही.

हिंमत कर, पुढे ये, तुझ्या पिढीला सलमा, सलीम, फातिमा, जियाला
धोकायला लाव अलिफ, बे, पे, से ......
व्यक्तिमत्व हरवलेल्यांना नसतो अधिकार जिण्याचा
अस्तित्व नाकारलेल्यांना आधार नसतो कुणाचा
आपले आपणच मिळवायचे असते.
शापात, दानात–वरदानात ते घ्यायचे नसते.''

स्वतःला विसरून धर्माने, चौकटीने लादलेल्या बंधनात स्त्रीयांच्या पिढ्यान्पिढया नष्ट होत आहेत. स्त्रीला भोगावे लागणारे दुःख तिच्या अशिक्षित अडाणीपणात आहे. सतत नाकारलेपणाच्या वेदनेत सहन करत स्वतःकडे नाकर्तेपणा घेऊन जगणारी स्त्री सुशिक्षीत झाल्याशिवाय तिला स्वतःचे अंगण, स्वतःची देवडी मिळणार नाही. म्हणूनच ''कान उघडे ठेवून जगावे, मन शुध्द ठेवून सजावे, विवेक असावा डोळस, मन असावे समृध्द संपन्न''. इथून तिथून जगातील स्त्रियांची स्थिती सारखीच मग ती ताली–बानी असो की भारतीय असो. ही स्थिती आपल्याला बदलावी लागेल, पुरूषप्रधान समाजात आपले अस्तित्व आपल्यालाच टिकवावे लागेल. वेळेस आपण Emotional Strength च्या मालकांणी असल्यामुळे पारध स्त्री का ठरू ? आपलेच रूप कधी सासूच्या तर कधी नणंदेच्या रूपाने छळते. खापर मात्र पुरूषप्रधान समाजावर

''छळण्याचे खापर Male वर का फोडाव
छळमालकिणही तूच, छळसाहनही तूच
कधी सासू होऊन कधी नणंद सून होऊन
पारधफास आपलेच तर आहे.''

मी एक लेक, आरसरूप, रेशीम पदराच्या गोठलेल्या कथा, कविता, वेद पुराण, संघर्ष छकुले ग सानुले ग, जी.ए. मर्ढेकर–सुर्वे, पारध स्त्री, अफगाणी तालीबान या कवितांमधून स्त्रिविषयक, जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. अफगानच्या विद्यार्थिनींनी स्त्री शिक्षणावर आणलेल्या बंदीच्या निषेधात, मोर्चा काढला. कवयित्रीला वाटते जर स्त्रियांना असाच बंदिवास घडत असेल तर एकेदिवशी तिला आईपण विसरून खलनायिका बनावे लागेल. सहज, साध्या, सोप्या शब्दात व्यापक आशय जुल्फी शेख यांच्या कवितेत आढळतो.

राजकीय दृष्टिकोनाच्या अनेक कविता या काव्यसंग्रहात आहेत. मी कोण ? श्रांत सत्य, पॅचअप, गाफिल व्हीजन, ना दाता ना दानी, भारत एक, जीवोजीव जीवनम, ईमान, कायम प्रोफशनल टॅक्स, डाव, पन्नासावी स्वातंत्र्याची पहाट, प्रदुषण, मऱ्हाठ वाणी माझी, रक्षक, ऐश्वर्य हया कवितांमधून देशाची राजकीय स्थिती, देशाची, फाळणी, फाळणीचे दुष्परीणाम, नेत्याचे राजकारण देशातील अर्थव्यवस्था, राजकीय घडामोडी, अराजकता, हिंदू मुस्लिम द्वेषाने होणारी हानी या सर्वांच्या निषेधात्मक कवितामधून देशाबद्दलची कळकळ व्यक्त होते.

''रक्तात न्हालेल्या स्नायूंना आज विचारत आहे
जालियनवाला बाग, बंगाल, भिवंडी, सूरतेतही
भूमीत विटलेल्या रक्तमासी माझाही भाग आहे
भगतसिंह बळवंत नामी अन्वरही शहीद आहे.''

स्वातंत्र्ययुध्दात फक्त हिंदूच नव्हे तर मुस्लिमही बरोबरीने सहभागी झालेत पण पाकिस्तानची फाळणी झाल्याबरोबर भारतीय मुस्लिम गुन्हेगार ठरले. फाळणी सामान्य मुस्लिम वर्गामुळे झाली नाही तर सत्ताधाऱ्यांच्या स्वार्थी सत्तालालसेमुळे झाली म्हणून सामान्य मुस्लिम जिनांचे वारसदार ठरत नाही. फाळणीच्या दुःखा सोबतच हिंदूच्या द्वेषात्मक व्यवहाराने मुस्लिमांची मनःस्थिती दिवसेंदिवस आक्रमक होत चालली, सत्ताधाऱ्यांनी हा खेळ थांबवला नाही तर देशाची लोकशाही धोक्यात येईल असा इशारा त्यांची कविता देते.

''मी सोसते इथे जो का माझाच दोष आहे,
तुमचाच भाई ना तो कां भारत पार आहे,
आठव जरा महात्म्या खरे सत्य ऑगस्ट आहे,
गल्लीत कलकत्याच्या बसलास का दुवेला,
तारीख कां रे घडली, इतिहास का रे घडला.''

महात्मा गांधीकडून भारतीय समाजाला अनेक अपेक्षा होत्या व त्या पूर्ण होण्याआधीच त्यांची हत्या झाली. पण फाळणी थांबवता येण्याचे जितके प्रयत्न करता आले असते तितके जर गांधीजींनी केले असते तर देश विभागला गेला नसता अशी आशा कवयित्रीला वाटते. देशाची ही दुभंगलेली स्थिती आणि त्यामुळे देशात होणाऱ्या दंगली, जाळपोळ, जातीवादी, धर्मवादी राजकारण, लोकशाहीतील सत्तेकरीता धार्मिक भावनेवर भर या सर्व बाबी लोकशाहीला मारक आहेत म्हणून जर फाळणी झालीच नसती तर..... हा प्रश्न सर्वच मुस्लिम मराठी कवी उपस्थित करतात कारण फाळणीमुळे कधी नसलेले दुय्यमत्व मुस्लिमांच्या वाटयाला आले आहे. देशात अनेक समस्या बाबरी मस्जीद, रामजन्मभूमी, काश्मिर, कारगील, आणि आता तर चीनचा प्रश्न निर्माण होऊन त्याचे वाईट परिणाम देशाला भोगावे लागत आहेत. याशिवाय दडपशाही, आंदोलने, संप, चळवळ, त्यातच

तत्कालीन नेते, निवडणूका, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, विदेशी कंपन्यांचा शिरकाव, स्वातंत्र्य सैनिकांचे बलिदान, सिमेवर असलेल्या सैनिकांचे कर्तृत्व, अर्थव्यवस्थेतील काळाबाजार अशा अनेक मुद्दयांवर कवयित्री गंभीर पणे प्रकाश टाकतात पण तरीही अंतरीचा आवाज हिंदूस्थानच निघतो आहे.

"आवाज अंतरीचा हिंदुस्तॉंच आहे ऐश्वर्य भोगताना कारवॉं अखंड आहे
दुःखात पांघरावे स्वप्नातही करावे पारसगीत माझे केव्हाच तिरंगरूप आहे"

अशी आशावादी ग्वाही, देशप्रेम, देशनिष्ठा कवयित्रीच्या अंतर्मनातून कवितेत निर्माण झाली आहे.

मी कोण ? मधील प्रेमकविता प्रेमाच्या उत्कट अनूभूतीची साक्ष देतात. सनम, तस्वीर, पाहिले ना मागे कधीही, एकटीच उरले, सांजभावीण या कविता मधून निकोप प्रेमाची ग्वाही दिलेली आहे. प्रियकर, पती यांच्या सहजीवनाने स्वतःच्या व्यक्तिमत्वाची होणाऱ्या विकासात्मक वाटचालीची कबुली अक्षरवेध या पहिल्या काव्यसंग्रहात आहेच. त्याचीच पुढची प्रगतावस्था दुसऱ्या काव्यसंग्रहात आहे. आपल्या प्रेमाने कन्याकुमारी ते काश्मीर असा एकसंघ भारत जोडण्याचा आशावाद कवयित्री व्यक्त करतात. जुल्फी यांच्या कवितांमध्ये कुठेही शारीरीकता डोकावत नाही तर आध्यात्मिकतेकडे भक्तीकडे झुकणारी त्याची शुध्द प्रेमभावना व्यक्त होते.

"माझ्या शरीरातला व्हावा तू आसमंत सारा
अंतराळातील तुझ्या मी होईन का दिपतारा
होऊन यावी मी गवसणी तू आवेश सारा
व्हावी पतंग मी तू खेळवावा भार सारा"

नशीबाच्या नावावर पत्नीला प्रेयसीला सोडून जाणारे पत्नीला भाडेकरू सारखे वागवतात, तिच्या हक्काचे घरही मिळत नाही. कवयित्रीला हे दुःख नसले तरी स्त्रीजातीच्या दुःखाची झळ त्यानांही आहे. मनात कुठेतरी स्त्रीच्या प्राक्तनातील दुःखाची सल त्यांना बोचते आहे म्हणूनच त्यांना वाटते की,

"व्यवस्थेने मानलेल्या वर्णव्रणासारखी
एक पतीत्व व्रत पाळणाऱ्या सती सारखी
मुहूर्त साधुनही उध्वस्त होणाऱ्या लग्नजोडयासारखी
तोलून तोलून पाहणाऱ्या सोनारासारखी आपली गत आहे."

अशा अवस्थेत स्त्रिया जगत असताना बुध्दिनिष्ठ होणे गरजेचे आहे म्हणून स्वतःसाठी हक्काचे ठिकाण असण्याची गरज कवयित्री व्यक्त करतात.

मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठमोळी परंपरा यांचेही कवयित्रीला भारी वेड आहे. साहित्य, संस्कृती म्हणून जे जे पवित्र ते ते सर्व जपले पाहिजे. पण आपण मराठी आहोत म्हणून कितीतरी लोकांना प्रश्न पडत होते, मुस्लिम साहित्याची गोडी असताना मराठी कशी काय साध्य होते अशी टिकाही केली जात होती.

"रचता जफर गालीब, स्मरता जौक दाग, मीर
मऱ्हाठ बोल यांना नकार देंत होते......
रूजली कशी मी काय ? चेहरे प्रश्नांकित होते
अस्सल मराठी मी हे उत्तर माझे होते
होते कशी मराठी आहे कशी मराठी सारेच माझे सारे"

यासोबतच वेद, शास्त्र, महाकाव्य, पुराण, मराठी संत, मराठी साहित्यिक, इस्लामी धर्म, शिकवण, सुफी संतांचा प्रभाव कवियत्रीवर पडून त्यांच्याबद्दलचा सन्मान कवितेत व्यक्त होतो. शायरी, गझल, निबांळकर, सुर्वे, मर्ढेकर, जी.ए. अल्ला उददीन, जावेद पाशा, ग्रेस, बहादूरशहा जफर, गालीब, जौक, शायर दाग, मीर, ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, देशातील महान व्यक्ति, देशातील निसर्ग, हिंदू–मुस्लिम धर्मस्थले, या सर्वांची महती आणि सन्मान व्यक्त करणाऱ्या कवयित्री देशाला नुकसान करणाऱ्या घटकांचा म्हणजे गोरी बोफोर्स, विदेशी कंपन्या, जागतिक बॅंकाचे कर्ज यांचा निषेधही व्यक्त झालेला आहे. म्हणून स्वतः मनोगतात म्हणतात, ''समज असून गैरसमज, उपेक्षा, प्रताडना, अपमान, दुय्यमत्व असून नसल्यासारखे आलेले जीवनी नकार, अस्तित्व नाकारण्याचा सतत सुरू असलेला प्रयत्न, फाळणी नावाने सतत प्रसारित होणारा माणूसभाव यात कुठेतरी समूहाचे Identification च नष्ट होण्याचे संकेत आहेत. आपल्या पूर्वजांच्या समर्पणालाच ठोकरत असल्याचा प्रत्यय जेव्हा येऊ लागतो अशावेळी चक्रकळीतील सर्व रंग दिसू लागतात. स्वत्व शोधत असताना स्वसमूहाचा शोध घेण्याचा हा प्रयत्न म्हणजे मी कोण ?'' या शब्दात आपल्या मी कोण या काव्यसंग्रंहाची भूमिका जुल्फी स्पष्ट करतात.

**अजून गाठी शिलकीत** हा कवयित्रीचा तिसरा काव्यसंग्रह असून यात एकूण 79 कविता आहेत. सर्व समावेशक आशयाच्या कविता हे या काव्यसंग्रहाचे वैशिष्टय होय. महत्त्वाचे म्हणजे काही कविता तर वर्तमान महामारीच्या संकटाला अनुसरून लिहिल्या की काय असा भास होतो. काव्यसंग्रह सप्टेंबर 2014 ला प्रकाशित झाला त्यापूर्वी कीतीतरी कालावधी अगोदर कविता प्रसवत गेल्या असतील त्यांना तत्कालीन संदर्भ तर आहेच पण भविष्यकालीन म्हणजे आजच्या या कोरोनामय भितीयुक्त काळातही त्या चपखल बसतात म्हणूनच साहित्यिक, कवी हा भविष्यदृष्टा असतो असे म्हणतात.

'हे कोणते शाप होते, हे झरे कोणते होते' असा प्रश्न विचारणारी ही कविता मनुष्याचे दुःख किती पटीने वाढले आहे, प्लास्टीक सिमेंटच्या जगात निसर्गाला जीवनबाह्य करण्यात येत आहे हे त्या दुःखाचे कारण तर नसेल ? ही वाढलेली दुःखावर्तने आजन्म हे हृदय आशेची स्थाने ....

नियतीची तुझ्या रे अशी स्थितीगती, हया वस्तूस्थितीत समाज संभ्रमात पडलेला आहे परिवर्तनाची दिशा हवी पण कशी, कुठून ? हे नक्की माहित नाही.

''सुखदुःखाच्या करूण जलधारा वाहायला लागतात,
तेव्हा परिवर्तनाच्या वेदीवर तुझे शिक्कामोर्तब होतात,
महिमानाचे गीतामृत मला न्हाऊमाखू घालतात
तेव्हा तुझे शांतिस्वरूप मनदार शिंपून जातात
तम प्रवृत्तीच्या गर्जना झाल्या की तू ठाकत असतो
म्हणून मावळत्या दिशांच्या प्रयाणास सलाम लाभणार नसतो.''

आजचे जगच असे आहे की प्रत्येक व्यक्ति आपल्याच आनंदात, नादात बेहोश आहे. हे बेहोश मदहोश असणे कधीतरी महागात पडेल कारण निसर्गाला स्वतःचा वणवा पेटवायला मानव आपल्या चुकांनी प्रेरणा देतो.

जुल्फी यांनी या काव्यसंग्रहात राजकीय, सामाजिक, प्रेमभावना, स्त्रीवाद, सांस्कृतिकता, जागतिकीकरण, आत्मभान, स्वतःचा शोध, अशा अनेक पैलूंना धरून आशय व्यक्त केला आहे. दंगली, फाळणीची वेदना, दुय्यमतेचे व्यवहार, अस्तित्वाचा प्रश्न, स्त्री म्हणून मुस्लिम आणि विद्वत म्हणून नाकारलेपणाची वेदना, लाचारीचे जगणे अशा सर्व भावभावनांचे चित्रण या कवितांमध्ये आहे. कयित्री ही नायिका नाही तर समाजातील स्त्री वर्ग नायिकेचे रूप घेते. अबला, शोषित स्त्रियांच्या वेदना जशा चित्रीत होतात तसेच जाहिरात स्वाहा ! नटी स्वाहा' सारख्या कवितातून चित्रपट, जाहिरातीतील स्त्रीचे, तिच्या अंगप्रदर्शनाचे निषेधात्मक चित्रण आहे.

''एक नवी जात स्त्रीत्वाची घालून वस्त्र तोटके मनमोहीनी होते

मी तर Wats Whats Your name - My name is

शील शीलाचे ब्रीद पदू लागले तर मी कसली नर्तक

मुन्नीच्या झटक्यात लावते झंडू तो ठरे सार्थक''

देहाचे बाजारपण कवयित्रीला मान्य नाही. जैन साधू दिगंबरावस्थेत असतात पण आजच्या नटया, मॉडेल मात्र कोणतीही दिक्षा न होता संकटाला आमंत्रण देतात. स्त्रीयांच्या नशीबी असलेले भोग तर संपत नाहीत पण अशा वर्तनाने अधिकच संकट अंगावर येते की वेदना कवयित्री व्यक्त करते. समकालीन वास्तवतेचे दर्शन या कवितेत निषेधाच्या दिशेने घडते. बाहुली युग पालटले रे आता, पाहुणीचे प्रश्न, विश्वसांधणी अन् स्त्री, झंकारले अशी मी, गर्भजलातील मुलगी, साजणाचे गाव बाई, ही मलमली पोत जीवाची, सारू उपऱ्या झुली, अगतिक नाही ना मी आहे उधाण वारा, स्त्री समर्थ स्त्री, जीवनयोगी सखी, मीच सम्राज्ञी, तू या अनेक कवितामधून वात्सल्य भावना, प्रेम, मातृत्व, जिव्हाळा यासोबतच मानव म्हणून जगण्याची आशा कवयित्री ने व्यक्त केली आहे.

याशिवाय देशाबद्दलची निष्ठा भक्ती, संविधानाबद्दलचा आदर, महापुरूषांची महानता, कवींचे, साहित्यिकाचे वेगळेपण, देशातील स्त्री आरक्षणाचा प्रश्न, मानवता धर्म, साहित्याबद्दलची गोडी, देशाचे तत्कालीन राजकारण, आत्मशोध यांचा अतिसंवेदनशीलतेने वेध घेऊन भविष्यातील संकटांचा कानोसा घेणाऱ्या संवेदना हे या कवितांचे विशेषत्व आहे. राजघाटास माझे प्रश्न, हे महात्मा गांधी, राष्ट्रपिता तुज प्रणाम ! या कवितांमध्य गांधीजीच्या बलिदानाचे फलित, तत्वज्ञानाच्या चिंध्या, वैष्णव जन तो तेणे कहिएजी जो प्रीत परायी जाने रे' चा विपर्यास, गांधीजीच्या नावावर खोटे पणाचा ढोंगी व्यवहार कसा होत आहे हे सांगताना, ''झापड घालून डोळयावर जाहीर सोंग दाखविणाऱ्यांनी जगधुंदीत आहे, जमते म्हणे, खोटया प्रतिष्ठेने हा अजब तमाशा दुनियेचा विध्वंस करीत आहे.'' जीवन मरणाचे, भरण पोषणाचे, विषमतेचे, दारिद्रयाचे, अपमानाचे, नष्ठत्वी तत्वांचे आशय समाजाला गवसले नाहीत म्हणून समाज महापुरूषांच्या विचारांना समजत नाही आणि जो वर्ग समजू शकतो तो स्वतःच्या स्वार्थापोटी आचरत नाही. स्वतःच्या व्यवस्थेचे हितसंबध गुंतलेले असल्यामुळे आजही अव्यवस्था अराजकताच आहे. अशा विविधांगी आशयाच्या कविता या काव्यसंग्रहात आहेत.

**समारोप :–** एकंदरीत जुल्फी शेख यांच्या अक्षरवेध, मी कोण ?, अजून गाठी शिलकीत या तीनही काव्यसंग्रहातील कवितांचा आवाका व्यापक आहे. भवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक परिस्थितीतील जे जे योग्य त्यांचा गौरव आणि जे जे जाचक, बंधनकारक त्यांचा निषेध हा त्यांच्या कवितांचा आशय आहे म्हणूनच अजून गाठी शिलकीत च्या 'व्रण माझे ठणकत राही' या मनोगतात त्या म्हणतात, ''मी

धारणा जोपासेन, अंतरात वसलेल्या शक्ती मौनालाही वाणी जाणून हृदयात माळून घ्याया तयार राहीन, नकाराचा भाग समजून ललाट शृंगारून घेईन पण सुगंधाचे उदास होणे कुठल्या काळाने समजून घेतले आहे..... करू नये स्वर्ग–नरकाची खंत, घाम गाळणाऱ्यांना आराम लाभत नसतो, परंतु तो हात पसरवणारा होत नसतो'' या वक्तव्यावरून कवयित्रीच्या प्रतिमेची उंची लक्षात येते. 'मी कोण' च्या प्रस्तावनेत वि.स. जोग म्हणतात, ''अक्षरवेध या संग्रहातील बहूतांश कविता समकालीन मराठी कवयित्रींच्या गुलगुलीत कवितांशीनाते जोडणाऱ्या आहेत.'' तर मी कोण ? या काव्यसंग्रहाबद्दल म्हणतात, ''गेल्या पन्नास वर्षात सहसा मराठी कवयित्रींनी जे भरीवपणे केले नाही ते म्हणजे समकालीन राजकारणाची पराकोटीच्या संवेदनक्षमतेने दखल घेणे ते महत्कार्य जुल्फी यांनी केले. लेखनगर्भ आत्मनिष्ठेच्या आदर राखूनही आत्मक्षुब्धतेच्या, आत्ममग्नतेच्या, संज्ञाप्रवाहाच्या जाळयात कवियित्री फारशी अडकलेली नाही हे ही बरे झाले. त्याच त्या प्रतिमा किंवा रूपके न वापरता कविता रसिकांच्या जाणिवा कशा विस्तारतात याचेही दाखले या संग्रहात भरपूर आहेत.''

अशा प्रकारे मुस्लिम मराठी काव्यप्रवाहात जुल्फी शेख यांचे नाव आत्यंत महत्त्वाचे आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, अरबी आणि उर्दू भाषेची उत्तम जाण असलेल्या कवयित्रीच्या ओळींमध्ये या भाषांची सरमिसळ असून व्यापक अर्थ व्यक्त होतो. Line of Control, Mail, माऊथपीस, Commitment involvement, rights, identification, What's your Name, टेक्नीकल, पॅचअप ॲनस्थेशिया, व्हीजन, प्रोफेशनल टॅक्स, पब्लिक, वर्ल्ड बॅंक, पीरॅमीड, मिनरल वाटर हे इंग्रजी शब्द, तर अलिफ बे, मनसल्वा, कुल्लू नफसून जायकतीत मौत, जिंदादिली, दिलवर, मुर्दा कौम क्या खाक जियेगी, रोटी कपडा और मकान, तराना, तस्वीर, बडे शजर ना सही, सुखी घास रहने दो, जमी के बदन पर थोडा लिबास रहने दो या हिंदी – उर्दू शब्दांनी त्यांच्या भाषावैभवाची साक्ष पटते. म्हणूनच सुरेख खोब्रागडे म्हणतात, ''डॉ. जुल्फी शेखांयांच्या कवितेत आणि जगण्यात एकप्रकारची जिंदादिली आहे. त्यांची कविता ज्ञानेश्वर, तुकाराम, चोखामेळा यांच्या संस्कारातून फुलली आहे म्हणूनच त्यांच्या प्रेमकवितेत भक्ती दिसते. जी.ए.कुलकर्णी, बा.सी.मर्ढेकर नारायण सूर्वे हे कवी त्याचा आस्थाविषय आणि प्रेरणाविषय आहेत. अशांच्या सहवासातून डॉ. जुल्फी शेख उभ्या झाल्या आहेत.'' कवीवर्य सुरेश खोब्रागडे यांचे कवयित्रीबद्दलचे मत सर्वच बाबतीत सार्थक वाटते. कॅन्सरसारख्या महाभयानक आजारावर मात करून आजही जिंदादिल राहून मार्गदर्शन करणे हे त्यांनाच शक्य आहे.

**संदर्भ :–**

1) डॉ.जुल्फी शेख : अक्षरवेध, जुल्फी प्रकाशन, नागपूर, 1990.

2) डॉ.जुल्फी शेख, मी कोण ? युगसंवाद प्रकाशन, नागपूर, 2001.

3) डॉ.जुल्फी शेख, अजून गाठी, शिलकीत, मध्यमा प्रकाशन, नागपूर, 2014.

4) डॉ. जुल्फी शेख, नवे प्रवाह नवे स्वरूप, विजय प्रकाशन, 2004.

5) स्मरणिका, मराठी काव्य सृष्टींत मुस्लिम कवींची भूमिका, (राज्यस्तरीय चर्चा सत्र) एस.एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया, 12 जानेवारी 2013.

6) फ.म. शहाजिंदे, मुस्लिम मराठी साहित्यः पंरपरा, स्वरूप आणि लेखक सूची, भूमी प्रकाशन, लातूर, 2004.

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October -2020

SPECIAL ISSUE NO - CCXLVI ( 246)

# Ideology of Mahatma Gandhi



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director

Guest Editor
Dr. R.K.Ippar
Principal

Executive Editor
Dr. B.K. Shep.
Head, Dept. of History

Executive Editor
Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Executive Editor
Prof.(Dr.) V.B. Gaikwad
P.G. Coordinator, Science

Jawahar Education Society's

**Vaidyanath College Parli- Vaijnath,Dist. Beed.**

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor-7.675 (SJIF)
ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October - 2020

ISSUE No - CCXLVI ( 246 )

# Ideology of Mahatma Gandhi

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director

Guest Editor
Dr. R.K.Ippar
Principal

Executive Editor
Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

Executive Editor
Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Executive Editor
Prof.(Dr.) V.B. Gaikwad ,
P.G. Coordinator, Science

Jawahar Education Society's
Vaidyanath College Parli- Vaijnath,Dist. Beed.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | रंगभेद विरोध चळवळीचे प्रणेता नेल्सन मंडेला यांच्यावरील गांधी–विचारसरणीचा प्रभाव– एक ऐतिहासिक अभ्यास | प्रा.अरूण वसंत अवसरमल | 1 |
| 2 | महात्मा गांधीजींच्या बुनियादी शिक्षण संकलपनेची यथार्थता | प्रा. डॉ.आशा एम.धारस्कर | 6 |
| 3 | महात्मा गांधीजींच्या नेतृत्वातील शेतकरी चळवळ : एक ऐतिहासिक अध्ययन | कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे | 11 |
| 4 | मा.गांधी–रामराज्य | प्रा.भारत विठ्ठलराव शिंदे | 16 |
| 5 | महात्मा गांधीजीचा शिक्षणविषयक दृष्टिकोन | प्रा. डॉ.भिम गणपतराव माने | 18 |
| 6 | महात्मा गांधी आणि अहिंसा | प्रा. डॉ.रमेश तु.देशमुख | 21 |
| 7 | महात्मा गांधी : सत्याग्रह चळवळ | प्रा. डॉ.बी.व्ही.डोंगरे | 23 |
| 8 | म. गांधी यांचे शिक्षण विषयक विचार | प्रा. डॉ. बायभासे शिवाजी विठठलराव | 26 |
| 9 | महात्मा गांधी यांचे अस्पृश्योध्दार विषयक कार्य | प्रा. डॉ.संतोष रोहिदरस पहारे | 28 |
| 10 | महात्मा गांधी आणि सत्याग्रह | प्रा. डॉ. नितीन बावळे | 32 |
| 11 | महात्मा गांधीजी यांचे शैक्षणिक विचार | प्रा. डॉ. पवार बालासाहेब शिवाजी | 35 |
| 12 | महात्मा गांधीजीचे शिक्षणविषयक विचार :एक वेध | प्रा. डॉ.नामदेव सोडगीर | 38 |
| 13 | महात्मा गांधीजींची मुलोद्योगी शिक्षण योजना : एक अभ्यास | प्रा. डॉ.पेटकर योगेश हिरामण | 41 |
| 14 | महात्मा गांधींचे सत्याग्रह विषयक विचार | डॉ. मुकुंद देवर्षी | 46 |
| 15 | महात्मा गांधी आणि ग्राम स्वराज्य | डॉ.गजानन देवराव चिट्टेवाड | 49 |
| 16 | असहकार चळवळीत महात्मा गांधीची भूमिका | श्री.तोंदुलवार गंगाधर लालु | 52 |
| 17 | म. गांधीजींची तीन माकडं : आवश्यकता चौथ्या माकडाची | डॉ. गंगणे जीवन सुदामराव | 55 |
| 18 | महात्मा गांधी : विचारधन | डॉ.घ.ना.पांचाळ | 62 |
| 19 | महात्मा गांधी व सविनय कायदेभंग चळवळ. | हितेश लिलाधर भोरटक्के प्रा.डॉ. पंकजकुमार शंकर प्रेमसागर | 66 |




२०:५२ ✓✓

| | | |
|---|---|---|
| 20 | चलेजाव चळवळ आणि महात्मा गांधी<br>जमीर अकबर आवटे | |
| 21 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रहविषयक विचार डॉ.प्रा.सौ. एस.पी. लाखे | 71 |
| 22 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विषयक विचार नवनाथ नागरे | 75 |
| 23 | महात्मा गांधी आणि ग्रामविकास –एक आर्थिक अध्ययन<br>डॉ. नितेश रा. बोरकर | 82 |
| 24 | आर्थिक विपन्नवस्थेच्या गर्तेतून सावरण्यासाठी महात्मा गांधीजींचे वैचारीक तत्वज्ञान<br>डॉ.प्रा.रावसाहेब भिमराव नेरकर | 86 |
| 25 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रहाविषयीचे विचार<br>प्रा.जया यशवंतराव बाविस्कर | 90 |
| 26 | महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचारांचे अध्ययन<br>श्री. राजकुमार तुकाराम राठोड | 92 |
| 27 | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची विचारसरणी प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई | 97 |
| 28 | गांधीवाद<br>डॉ. संजय गोपाळराव ठवळे | 101 |
| 29 | महात्मा गांधीं यांचे सत्याग्रह विषयक विचार प्रा. सुरेश नारायण पाटील | 106 |
| 30 | महात्मा गांधीजीचे शिक्षणविशयक विचार प्रा. सुमन साहेबराव बैसाणे | 109 |
| 31 | ग्रामविषयी महात्मा गांधी यांचे विचार सुलोचना नि.चाटे | 113 |
| 32 | शैक्षणिक विचारक्रांतीचे महाजनक : महात्मा गांधीजी<br>डॉ. विजेंद्र श्रीकृष्ण पुराणिक | 118 |
| 33 | महात्मा गांधी यांची सत्याग्रह संकल्पना : एक शोध संध्या उद्धवराव करमनकर | 120 |
| 34 | महात्मा गांधीचे अहिंसा विषयक विचार डॉ.प्रा.पावडे के.डब्ल्यु. | 125 |
| 35 | महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचार प्रा.डॉ.संजय बाबुराव वाकळे | 130 |
| 36 | ग्रामीण विकासातील महात्मा गांधीजींचे योगदान<br>प्रा.संतोष बन्सीलाल राठोड | 133 |
| 37 | महात्मा गांधी एक सर्वज्ञ डॉ. शंकर मारोती सावंत | 135 |
| 38 | मा .गांधी यांचा भारतीय शिक्षणाविषयक दृष्टिकोन –एक अभ्यास<br>डॉ आर आर पिंपळपले | 140 |
| 39 | महात्मा गांधीजीचे शिक्षणविषयक विचार प्रा. ज्योती आधार चौधरी | 144 |
| 40 | महात्मा गांधीजी यांचे शिक्षण विषयक विचार डॉ. एस.एम.सातपुते | 150 |
| 41 | सविनय कायदेभंग चळवळ व महात्मा गांधी ज्योती अर्जुन शिंदे | 155 |
| 42 | गांधी विचार व खादी डॉ. चंदन एम. बावलगावे | 159 |
| | | 163 |




२०:५३

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | 2278-9308
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 246 | October,2020


| | | |
|---|---|---|
| 43 | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार व कार्यसंपदा एक चिंतन डॉ. सौ. वंदना राजेश शिंदे | 166 |
| 44 | महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी | 172 |
| 45 | महात्मा गांधी व स्त्रीवाद : ऐतिहासिक अवलोकन प्रा.डॉ.रामभाऊ काशीद | 174 |
| 46 | महात्मा गांधीचे अहिंसाविचार प्रा.डॉ. सुदर्शन सदाशिव क्षेत्री | 177 |
| 47 | मुस्लिम मराठी काव्यातील गांधी विचार दर्शन डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज | 179 |
| 48 | ग्राम विषयी महात्मा गांधी यांचे विचार रा.ज. चाटे | 185 |
| 49 | असहकार चळवळ व भारत छोडो आंदोलनातील महात्मा गांधीजींची भूमिका डॉ.राधाकृष्ण जोशी | 188 |
| 50 | महात्मा गांधीजी आणि असहकार आंदोलन डॉ. किशन केंद्रे | 190 |
| 51 | म.गांधीजींचे महिला सबलीकरणातील योगदान : एक अभ्यास प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे | 195 |
| 52 | महात्मा गांधीची सामाजिक,आर्थिक विचारधारा प्रा.डॉ रामधन हिरे | 198 |
| 53 | महात्मा गांधी एवं भारत छोड़ो आंदोलन डॉ. प्रतिमा गुप्ता | 202 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 246
ISSN : 2278-9308
October,2020

# मुस्लिम मराठी काव्यातील गांधी विचार दर्शन

डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज
मराठी विभाग प्रमुख
एस.एस.गर्ल्स कॉलेज,गोंदिया. (महाराष्ट्र) अंसारी वार्ड, विठ्ठल नगर, गोंदिया 441601

प्रस्तावना :-

मुस्लिम मराठी साहित्याचा जन्म प्राचीन मराठी साहित्याबरोबर सहाव्या शतकात होऊन विकासही मराठी साहित्यासोबतच झाला. मराठी साहित्यातील महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, नाथ पंथीय साहित्य, ख्रिस्ती संताचे मराठी साहित्यही निर्माण झाले. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संतांसारखी आलम खान, मुंतोजी उर्फ मृत्यूंजय, हुसेन अंबरखान, शेख महमंद शहामुनी, शेख सुल्तान, बाजीद पठाण, शहा नवरंग, शहा हुसेन फकीर, जंगली फकीर, सय्यद हुसेन, शेख सलीम महमंद, लतिफ शहा, सय्यद शाह, मोमीन अरिफुल्लाह या संतानी ही मराठीत साहित्यरचना केली. यापैकी मुंतोजी उर्फ मृत्यूंजय, बाबा शेख महमंद, शहामुनी यांची ग्रंथसंपदा जास्त आहे. मराठी शाहिर राम जोशी, होनाजी बाळा, परशूराम या शाहिरांबरोबरच संगन भाऊ, शहा अली, हुसेन खान, रसूल पिजांरी, अगीनदास, गरीब अब्दूल, बाबासाहेब हनीफ महमंद या शाहिरांनी शाहीरी वाङमयात भर टाकली. महत्त्वाचे म्हणजे कर्नाटकच्या इब्राहिम आदिलशहा या राजाने मराठी भाषेला राजभाषा म्हणून जाहीर केले. संत साहित्यातील मुस्लिम संताची ही मराठी रचना मराठी कवितेला समृध्द करते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात शहिर अमरशेख यांची रचना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अजीज नदाफ एतबार खॉ पठाण, बदिउज्जमॉ खावर, शब्बीर मुलाणी, महमुद सारंग या कवींनी केलेली रचना सामान्य रचना आहे."येता संस्कृती भास्कर गगणी निर्मळ होईल अवघे पाणी

होऊ द्या काहिली जिवाची आळवा नवं संस्कृतीची गाणी"(अमरशेख, कलश पृ.११)

किंवा

"मृत्यो ...... तू कसा आहेस हे मला माहित नाही पण –

तू कोण आहेस हे मी जाणून आहेतू जादूगर आहेस" (एतबारखान पठाणः तहान)

अशा कवितांमधून सामान्य जीवन जाणिव व्यक्त होते स्वातंत्र्याचे वारे वाहू लागल्यावर संपूर्ण वातावरण बदलले. नवीन विचारांचा प्रचार प्रसार होऊ लागला. विविध घडामोडीचा विशेषतः राजकीय घडामोडींचा प्रभाव भारतीय जीवनाप्रमाणे मराठी समाजावर, साहित्यावर होऊ लागला. अशा विविध विचारसरणीचा, साहित्यातील परिवर्तनाचा प्रभाव मुस्लिम मराठी साहित्यावरही झाला व याचेच फलित म्हणून १९३५ मध्ये सय्यद अमीन यांनी प्रथमच मुस्लिमांच्या मराठी साहित्याकरीता 'मुस्लिम मराठी साहित्य' ही संज्ञा वापरली. आणि मुस्लिम मराठी साहित्य हा मराठी साहित्याचा नवा प्रवाह निर्माण झाला. या प्रवाहातील मुस्लिम कवी धर्माने मुस्लिम होता पण मराठीचा अभिमान बाळगणारा मराठीला मायबोली मानणारा होता.

मुस्लिम मराठी कविता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५०–६० च्या काळात मुस्लिम मराठी साहित्याची जोमाने निर्मिती झाली. कविता, कथा, कादंबरी, नाटक, वैचारिक साहित्य या सर्व प्रकारामध्ये लेखन होऊ लागले. पण काव्यलेखन मात्र मोठया प्रमाणात झाले. खलील मोमीन, इलाही जमादार, अे.के. शेख, फ.म. शहाजिंदे, फातिमा मुजावर, इकबाल मुकादम, जहीर शेख, एहतेशाम देशमुख, शेख आयुब, बादशहा सैय्यद, मलिका अमरशेख, डॉ.एस.एन.पठाण, शब्बीर मुलाणी, डॉ. जुल्फी शेख, डॉ.मिर्जा रफी बेग, कलीम खान, इब्राहिम खान, शेख इकबाल मिन्ने, जब्बार पटेल, अजीम नवाज राही, मुबारक शेख, बदिउज्जमा बिराजदार, जावेद कुरैशी, ऐजाज जोश, मुजफ्फर सैय्यद, शफीक शेख,सय्यद अल्लाउद्दीन,

रब्बानी शेख, डी.के.शेख, कलाम अहमद खान, मिर्जा बिलोलीकर, शफी बोल्डेकर, हबीब भंडारे, इरफान शेख या मुस्लिम कवींनी समृध्द अशी काव्यरचना मराठीत केलेली आहे आणि करत आहेत.

**मुस्लिम मराठी कविता आणि राजकीयता** राष्ट्र ही राजकीय संकल्पना असून राष्ट्रीयता, राष्ट्रवाद यांना साहित्यात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक साहित्यात या संकल्पना विविधांगी स्वरूपात असतात. भविष्य आणि वर्तमान काळातील घडामोडी राजकीय संदर्भातून मुस्लिम मराठी कवितेतही आलेल्या आहेत. समाज, धर्म, जात असे कोणतेही बंधन न पाळता आपण फक्त भारतवासी असण्याचा राष्ट्रभक्तीवादी दृष्टिकोन ही कविता प्रकट करते.

''हिंदु मुस्लिम सिख इसाई मिळून राहू सारे भाऊ–भाऊ,
'नांदो शांती सदा या देशात, बापु' नेहरू आझांदांचा आहे हा संदेश
मंदिर, मस्जिद, चर्च, गुरूद्वारा सर्वांचे आहे हे श्रध्दास्थान
विषमतेच्या भेदभावाला विसरून जाऊ पंथ प्रांताला
विदेशाला शिकऊ पाठ आम्ही बनउ भारत महान'' (सय्यद जब्बार पटेल, एकात्मता)

संस्कृती, परंपरा, मातृभूमीबद्दल प्रेम, निष्ठां, नितीमूल्याबद्दलची ओढ, सर्वधर्मसमभावाची भावना, विषमतेबद्दलची नकारात्मकता अशा अनेक वैशिष्टयांनी मुस्लिम मराठी कविता नटलेली सजलेली आहे.

''जय भारती ! जय भारती ! स्वीकार माझी आरती तू जन्मभू, तू कर्मभू देहातया तू मर्मभू ही लेकरे तुझ्यावरती आयुष्य आपुले वारती''(कलीम खान – कलीमच्या कविता)

भारतीय संस्कृती आपल्या नैसर्गिक, सांस्कृतिक धार्मिक अशा विविध वैशिष्टयांसह नटलेली असून सामान्य मंनूष्याचे श्रध्दास्थान आहे. श्रीकृष्ण, गुरुनानक, बुध्द आणि ख्वाजा इथेच अवतार घेतात तर बहादूरशहा जफर, शिवाजी महाराज, गांधीजी, चंद्रशेखर आझाद, विवेकानंद पंडीत नेहरू सारखे नररत्न ही हयाच भूमीच्या पोटी निर्माण होतात अशी वंदनीय भावना या कवितांमधून व्यक्ती झाली आहे.

**मुस्लिम मराठी कवितेचे बदलते स्वरूप** १४ ऑगस्ट १९४५ भारत–पाक विभाजन झाले. हे विभाजन देशाच्या सिमेसोबतच मुस्लिम मराठी मनाचेही होते. कारण फाळणीचे अनेक परिणाम भारतातील मुस्लिमांना तर पाकिस्तानातील हिंदूना भोगावे लागले. देशाच्या बदललेल्या भूगोलामुळे हिंदू–मुस्लिम असा नवा धार्मिक प्रश्न निर्माण होऊन परस्पर मन कलुलित करत राहिला याचीही दखल या कवितेने घेतली आहे. पण देशाप्रती निष्ठा मात्र सोडली नाही. देश फाळणीचे भयंकर परिणाम मुस्लिम धर्मीयांना भोगावे लागले याची दखल तर घेतलेलीच आहे पण स्वातंत्र्यांप्राप्तीनंतर देशाकडून, शासनाकडून सामान्य, जनतेच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाही उलट अपेक्षाभंग झाला. मानवाधिकारांचे झालेले हनन, लोकशाहीच्या मूल्यांची निराशात्मकता या सर्वांचे वर्णन या कवितेत असून भारतमातेचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले आहे. ''जगा वंध भारत भू अमुची कालही होती आहे. आज अखंडता टिकवा देशाची भारतभूमीवर चढवा साज, स्वातंत्र्याची शपथ तुला रे घेण्यापेक्षा दाता हो,माणसा माणसा जागा हो देशाचा एक धागा हो'' (अे.के. शेख, जुलुस माझा)

भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळातही भारत ही आमची माता असून तिचे श्रेष्ठत्व अबाधि राखले पाहिजे याकरीता सर्वांनी प्रयत्नशील राहावे असा संदेश ही कविता देते.

**महात्मा गांधी बद्दलचे विचार, कल्पना** स्वातंत्र्यलढयातील महत्त्वाचे नाव म्हणजे मोहनदास करमचंद गांधी. ज्यांना भारतीयांनी त्यांच्या निरपेक्ष कर्तृत्वामुळे महात्मा, राष्ट्रपिता हा आदरसन्मान दिला. जवळपास साहित्याच्या प्रत्येक घटकाचा आदर विषय बनलेले महात्मा गांधी मुस्लिम मराठी काव्यात विविधतेने व्यक्त होतात. भारत–पाक फाळणीपासून तर वर्तमानकालीन राजकारणाच्या बदलत त्या स्वरूपातही गांधीजींची प्रतिमा, त्यांचे विचार या काव्यप्रवाहात पेरलेले आहेत. नागपूरचे कवी जावेद पाशा यांच्या २०११ ला प्रकाशित झालेल्या काव्यसंग्रहाचे नाव'' हे गांधी कशातच राम नाही'' असून तत्कालीन परिस्थितीचा प्रत्येक धागा गांधीजींच्या विचारसरणीशी, जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. नाथूराम गोडसे ने गांधीजींची हत्या केली म्हणून तो मारेकरी ठरतो पण भारतीय लोकशाहीच्या प्रणेत्यांनी त्यांच्या विचारांची हत्या केली आणि आम्ही त्याच्यांच आदेशानुसार जगतो म्हणून आम्हीही गांधींजीचे हत्यारे ठरतो असा

आशय विस्तृत रूपात या काव्यसंग्रहात व्यक्त केला आहे. तत्पूर्वी जुल्फी शेख, अजिज नदाफ, एहतेशाम देशमुख, कलीम खान, जावेद कुरैशी, इलाही जमादार यांनी आपल्या कवितांमधून गांधीजींचे कार्य त्यांची विचारसरणी आणि फाळणीला ते कितपत जबाबदार होते याचाही विचार केला आहे. राष्ट्रपिता म्हणून निदान त्यांनी फाळणी पासून देशाला वाचवायला पाहिजे होते. थोडे का प्रयत्न झाले असते तर आमचा भाऊ पाकिस्तान सिमेपार गेला नसता अशी आशा बाळगून जुल्फी शेख विचारतात.

तुमचाच भाई ना तो का भारत पार आहे
आठव जरा महात्मा खरे सत्य ऑगस्ट, आहे.
पडला सडा शिरांचा तू गपगार होता तू थंडगार होता
गल्लीत कलकत्याच्या बसलास का दुवेला
तारीख का रे घडली इतिहास का रे घडला
नकार विभाजनाचे शिवले का न मनाला" (जुल्फी शेख, मी कोण ?)

भारत–पाकिस्तान फाळणीमुळे भारतातील मुस्लिम समाजाचे आणि पाकिस्तानातील हिंदू समाजाचे धर्मद्वेषामुळे सर्वच बाबतीत होत असलेले खच्चीकरण पाहून या समूहांना सामान्य जीवन जगता येईल की नाही हा प्रश्न निर्माण होतो. जर सामान्यांना हा प्रश्न पडत असेल तर गांधीजी सारख्या महान विभूतीला फाळणीचे दुष्परीणाम माहित असूनही फाळणी का होऊ दिली ? फाळणी होत असताना दुवा मागून कत्तली थांबणार नव्हत्या, पाकिस्तानातून येणारे हिंदू आणि भारतातून जाणारे मुस्लिम यांच्या प्रचंड कत्तली, अमानुष नरसंहार हे फाळणीचे फलित होते, ते थांबवता आले नसते का ? असा प्रश्न जुल्फी शेख यांनी विचारला आहे. पुढे त्या म्हणतात,

"नाहीतरी १९४७–१४ ऑगस्ट १५ ऑगस्टचे आक्रित
सर्द टिळा होऊन माझ्या माथ्यावर कायम आहेत"

१४ ऑगस्टला निर्माण झालेली LOC मुस्लिम मराठी कवयित्रीला सर्वच बांजूनी दुंभगते आणि मी कोण ? असा प्रश्न पडतो.

महात्मा गांधीचा मृत्यूही कवीकरीता अत्यंत भावविव्हल करणारा विषय. राष्ट्रपित्याने स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद अजून अनुभवलाचं नाही, हिंदू मुस्लिम प्रश्न अजून सुटलेच नाही, दंगली कत्तली होतच आहेत अशा अवस्थेत भारतात शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून १३ जानेवारी १९४८ पासून २१ दिवस उपोषण सुरू केले. सोबतच भारताने फाळणीच्या वाटणीचे ५५ कोटी रूपये पाकिस्तानला दयावे म्हणून आग्रह धरला. भारतीय मुस्लिम समाजाचे जीवन भयग्रस्त न राहता सुरक्षित राहील अशी प्रतिज्ञा भारताला घ्यायला लावली. अशातच उपोषणाचा कालावधी संपण्यापूर्वीच ३० जानेवारी १९४८ला नाथूराम गोडसेने त्यांची प्राणज्योत विझविली. ही भारताच्या इतिहासातील काळीकुट्ट घटना भारतीय समाजाला पोरके करून गेली. कलीम खान म्हणतात,

मला हवी आहे ती दुदैवी गोळी जी घेवून गेली,एका महात्म्याच्या जीर्ण–शीर्ण शरीरालानथ्थूरामाच्याच वाटेने जाऊ पाहणाऱ्या त्यांच्या पथभ्रष्ट अनुयायांना, मला दाखवायचा आहे त्या गोळीच्या बारूदीतदशकानंतरही उरलेला अंहिसक आक्रोश,आणि सांगावयाचं आहे त्यांना आवर्जून(कलीम खान, कलीमच्या कविता)

या महामानवाच्या शरीराला छेदणारी गोळी दुदैवी आहे कारण तीने राष्ट्रभक्त, राष्ट्रपित्याचे प्राण घेतले. संत मीराबाई, येशू खिस्त, साक्रेटिस यांच्या पंक्तीत जाऊन बसलेल्या गांधीजींची हत्या नाथूराम सारखे पथभ्रष्ट नेते व त्याचे अनुयायी यांनी केली पण त्या बंदुकीच्या गोळीतील बारूद दहा वर्षानरही शांत न होता अंहिसक आक्रोश व्यक्त करत आहे. गांधीजींनी जीवनभर अंहिसा आणि सत्य या जीवनमुल्यांची जोपासना केली. त्याच जीवनमूल्यांच्या आधारे जनता आक्रोश करते आहे. त्या गोळीने फक्त कधी ना कधी नष्ट होणारे शरीर संपले पण व्यक्तिविचार मात्र कधीही संपत नाही. उलट अदम्य विश्वासाने प्रकाशीत होऊन मना–मनात चिंरतन तेवत असतात.

"अरे मूर्ख शहाण्यांनो,गोळया घातल्याने संपत असतात फक्त नश्वर शरीरे

Impact Factor 5.455
www.sjifactor.com

p-ISSN 2349-9370
e-ISSN 2582-4848

Stay Home, Stay Safe

Control the

# CORONAVIRUS

Vol. 7 Issue 8
Oct. 2020
Regular Issue 1

# Research Journal of India

www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

Peer Reviewed Multi-Disciplinary
Annual National Indexed Research Journal
Published as per UGC (India) Guidelines

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (INDIA)

# मुस्लिम मराठी काव्यातील सामान्य स्त्री चित्रण

डॉ. कविता राजाभोज
मराठी विभागप्रमुख
एस. एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया, महाराष्ट्र (India)
Email: parthkavita@gmail.com भ्रमणध्वनी ९२८४७६३८८४

## प्रस्तावना

"मुस्लिम मराठी काव्य" हा मराठी काव्याचा एक समृध्द असा प्रवाह होय. मराठी काव्याच्या प्राचीन परंपरेसोबतच हा प्रवाह जन्माला आला. संत साहित्यासारखी रचना मुस्लिम संतांनी मराठीत केली. संत आलमखान, मुंतोजी उर्फ मृत्युंजय, हुसेन अंबरखान शेख महमद, शेख सुल्तान, सैयद महमद, शहा हुसेन फकीर, जंगली फकीर, सैयद हुसेन या आणि इतर संतानी काव्यरचना केली."ज्यासी रुप नाही रेखा । अव्यक्त माझा सखा भावभक्तीची या सुखा। साकारला" असे बाबा शेख महमंद म्हणतात तर संत चोखामेळ्यासारखी खंत शहामुनी व्यक्त करताना म्हणतात,"नव्हे यातीचा ब्राम्हण, क्षत्रिय वैश्य नोहे जाण । शुद्रापरिस हीन वर्ण । अविश्वंशी जन्मलो। तर सैयद महमंद गोपीची भूमिका घेउन कृष्णमक्ती मध्ये लीन होतात तुझया वेणूवाच्या नांदे मी भूलले रे कान्हा । जै त्वा वेणुवाचा नाद माझे मीपण विसरले।।

अशी सामान्य मराठी काव्यरचनेसोबतच अनुभवसार, अद्वैतप्रकाश, जिवोध्दारण, स्वरुप समाधान, प्रकाशदीप, पंचीकरण, योगसंग्राम, निष्कलंकबोध, सिध्दान्तबोध, विजय भैरव अशा अनेक ग्रंथाची रचना मुस्लिम संतानी केली आहे.

मराठी शाहिरी साहित्यासारखी रचना मुस्लिम मराठी शाहिरांनी केली असून सगनभाऊ, हुसेन खान, शहा अली, रसूल पिजांरी हे प्रमुख मुस्लिम मराठी शाहीर होत. शिवकाल, पेशवेकाल, इंग्रजी अमदानीचा काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ अशा विविध कालखंडात मुस्लिम मराठी साहित्य निर्माण होत राहिले.

१९३५ मध्ये प्रथमच सैयद अमीन यांनी या साहित्याकरीता "मुस्लिम मराठी साहित्य" ही संज्ञा वापरली आणि कथा, कविता, कादंबरी, नाटक, वैचारिक लेख, ललित निबंध या विविध प्रकारांमध्ये विविधांगी लेखन होऊ लागले. त्यातही काव्यलेखन मोठया प्रमाणात झाले स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काव्यलेखनाचा ओघ अधिकाधिक विकसित होउन राष्ट्रीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यक्तिवादी, साम्यवादी अशा विविध मुद्दयांची दखल या कवितेमध्ये घेण्यात आली आहे. या सोबत भारत–पाकिस्तान फाळणी व फाळणीचे परिणाम, विभाजनाची वेदना अशा अनेक भाव–भावनाचे ज्वलंत चित्रण या काव्यप्रवाहात आहे. फाळणीपूर्वी मुस्लिम समाज हा सामान्य मराठी समाजासारखाच होता पण विभाजनाने मने दुंभगली, धर्मद्वेषाची पेरणी झाली. भारत–पाक अशी सिमेचीच नव्हे तर हिंदू–मुस्लिम अशी मानवी मनाचीही फाळणी झाली होती.अशा विभाजनची तीव्र वेदना व्यक्त होत असली तरी कवीमन मात्र समान्य मराठी होते म्हणून महाराष्ट्रीय परंपरेचे वर्णन, भारतीय संस्कृतीचे आचारविचार व संस्कृती दर्शन मुस्लिम मराठी कवितेत आढळते.

## मुस्लिम मराठी काव्यातील स्त्रीचित्रण :–

मुस्लिम मराठी काव्यात स्त्रीचित्रण करणा–या अनेक कविता आहेत. स्त्रियांचे जीवन पारंपारिकता, स्त्रियांच्या समस्या, परिवर्तवादी स्त्री, स्त्री जीवनातील अंतमुर्खता अशा अनेक दृष्टिकोनाने या काव्यप्रवाहात स्त्रीवाद प्रकट झालेला आहेत. या काव्यप्रवाहातीलस्त्रीचित्रण दोन अंगाने आले आहे. १) सामान्य मराठी स्त्री २) मुस्लिम स्त्री. मुस्लिम मराठी कवितेतील सर्वसामान्य स्त्री भारतीय संस्कृतीतील असून पारंपारिक आचारविचार, रुढी परंपरा यांना मानून दैनंदिन जीवन जगणारी आहे. "खांद्यावर मुल असते, घेतलेल्या पदराची झोळी असते, चालण्यात ओढ असते, अशी नारी रमते संसारी, भरल्या घरात मुले असतात, आईचीवाट पाहत असतात, आजी–आजोबा सोबती असतात, अशी नारी रमते संसारी"अशा सामान्य स्त्रीचे जगच तिचे कुटुंब असते. (शब्बीर मुलाणी, चावडी)

या काव्यप्रवाहाच्या सामान्य मराठी स्त्री दर्शनातील स्त्रीचे मायाळू आई, संसारातील सहचारिणी, नाजूक मुलगी, सासरची नववधू अशा विविध पैलूंची दखल घेणा–या कविता या काव्यप्रवाहत आहेत. यापैकी संपूर्ण जगाने

मान्य केलेली आईची महती या कवितांमधून विस्तारीत स्वरुपाने आलेली आहे. कवी मन्सूर एजाज जोश आपल्या जेरबंद या काव्यसंग्रहात म्हणतात,

''माझे डोळे अधू झाले आहेत
जर जिवंत असती आई माझी
तिला मी मनसोक्त बघितले असते
माझया डोळयात तेज आले असते''

प्रत्येकाची आपल्या आईवर नितांत श्रध्दा असते. आईचा जिव्हाळा, तिची, विशालता शब्दात सामावणारीनाही, ती अनुभवावीच लागते. इलाही जमादार म्हणतात,''कशी तुला'' लाभली नजर ही कसे तुला लाभले हद्या, हे?अंनताहूनी अनंत जे अन असीमाहुनी विशाल आहे,आई या शब्दाची जादू ही तर देवा कमाल आहे,फक्त सोसणे तिजला ठाउक, केवळ खस्ता तिच्या नशीबी, कमळफुलासम तिला लेकुरे आई म्हणजे मृणाल आहे'' आईचा आ म्हणजे आत्मा आणि ई म्हणजे ईश्वर, ईश्वराचा आत्मा असलेली आई आपल्या अपत्यांना कमळफुलाप्रमाणे सांभाळणारी नाजूक मृणाल असून वात्सल्याचा उत्कट अविष्कार आहे. प्रसंगी कष्ट करुन, स्वतःच्या पोटाचा कालवा सहन करत, गरीबीशी झगडत आपल्या अपत्यांना जेवू घालणारी आई जीवनात धावत असते.

''उन्हाने चेह–यावर येणा–या सुरकुत्या लपवित झपझप चालते,पावसाने होणारा मारा सहत जीवनात धावते माझी माय'' (इरफान शेख, कोवळे पाषण.) आपले अपत्य अशा आईला सतत आनंदी राहावे, समाधानी राहावे असे वाटते म्हणून प्रसंगी ती कानउघडणी करण्याकरिता मागेपुढे पाहत नाही.

''अशाच एका संध्याकाळी बसून घराच्या उंबरठयावरहोती म्हणाली असेही, सहज एकदा
बेटा उनसे अपनी सगाई नही होती,अपना कुल कान्होपात्राका कुल है''

(फ.म. शहाजिंदे निधर्मी)

आपण हीन कुळातील असल्यामुळे लग्नव्यवहार उच्चकुळात होऊ शकत नाही ही ठामपणे सांगणारी आई अंधश्रध्दाळू आहे.''फकीर कुछ भी कर'' मेहबुब सुभानिकी ग्यारवी कर'' अशा आईचा विरह कोणालाही व्हायला नको ज्यांची आई जगात नसते त्यांना संपूर्ण जग परके वाटून आर्शिवादाशिवाय जीवन वाया गेल्यासारखी भावना निर्माण होते.

''तुझे रुप आई पाही ठायी ठायी, चंद्र अनसूर्य तुझे दोन, डोळे मृत्योचे ग्रहण लागे काळेकाळे, आम्हा सोडण्याची झाली का घाई, डोळे तुला आता पाही विश्व वेदनात, दिसे तुच मला दुखी या जनात''

आईरुपी स्त्रीचे हे विविधांगी रुप मुस्लिम मराठी कवितेत सामान्य रीतीने अवतरते हयाआई प्रतिमांना मुस्लिम धर्माचा स्पर्श झालेला नसला तरी जावेद कुरैशी यांची अम्मा, नवजात शीशूची आई राशिदा, इकबाल मुकादमा यांची जगरुपीआई, जुल्फी शेख यांची जागृत परिवर्तनावादी आई फ.म. शहाजिंदे यांची अंधश्रध्दाळू कष्टकरीआई,शफी बोल्डेकरांची प्रेमळ आई, रब्बानी शेख यांची काळांनुसार बदलती आई अशा आईच्या अनेक प्रतिमा या कवितांमूधन साकारल्या आहेत.

जीवनाच्या ससांराचे दुसरे चाक म्हणजे पत्नी–सहचारिणी हा अत्यंत भावमधूर असा विषय होय. स्त्रीचा श्रृंगार आणि मातृत्व या दोन्ही पैलूंना साहित्यात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. श्रृंगारातूनच प्रेमकवितांची व्याप्ती वाढली असून प्रेयसी, पत्नी व तिचे सौंदर्य हा या कवितांचा महत्वाचा घटक होय. मुस्लिम मराठी कवितेतूनही स्त्रीचे प्रयेसीरुप पत्नीरुप विविध दृष्टिकोनातून प्रगट होते. खांद्यावरमूल असणारी, ससांरात रमणारी पत्नी ही आपले सौभाग्य असते. संसारात प्रत्येक संकटात ठामपणे पतीच्या खांद्याला खांदा लावून उभी असणारी ही पारंपारीक स्त्री इच्छा असतानसताना मुलांची वाट पाहत मुलींना जन्म देत असते प्रत्येक कुटूंबाची एकतरी मुलगा असावा ही इच्छा असते. प्रेमळ पत्नीलाही गर्भपात, नको असलेल्या अपत्याचा त्रास सहन करुन ही इच्छा पूर्ण करावी लागते.

''मुलग्याच्या अपेक्षेने तीन–तीन मुलींना जन्म देणारी ती अबला, सत्तावीस महिन्यांचा त्रास भोगणारी ती माता, पुत्र देउ शकली नाही म्हणून पुरुषरुपी दिव्याखालचा स्त्रीरुपी अंधार''. (इकबाल मुकादम, नदी)

पुरुष हाच वशांचा दिवा असून त्या दिव्याला जन्म देणारी स्त्री मात्र दिव्याखालचा अंधारच असते. भारतीय पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्री कितीही उच्चाशिक्षित उच्चपदस्थ बुध्दीवान असली तरी पतीरुपी पुरुषा मागेच तीचे स्थान असते. या दुय्यम स्थानाला तिनेही मान्य केलेले असते. वरवर समाज कितीही सुधारला असता तरी आतून मात्र तसाच असतो. ''मुलीचे ममत्व म्हणजे पुरुषी अभिशाप, असल्या अंधाराचे छोटे–छोट दिवे, सा–यांच्या घरी पेटलेले दिसतात बाहेरुन उजेड आत मात्र अंधार'' हे सर्व सहन करणारी पत्नी पतीच्या प्रेमाची भुकेली असते ''आणिन म्हणतुया धा तारकेला आभाळी रंगाचं नवं लुगड, हेला शानपण म्हणायच धनी, मग येडेपणा म्हणायचं

पारु, तसं नव्हं धनी अवं पावसाळा आला डोक्यावर छप्पराची पार भोक झालीत....।

(जहीर शेख, नार्सिसस)

संसारातील गरीबी, दुःख झेलता–झेलता ती इतकी रममान झाली असते की स्वतःचे अस्तित्व विसरुन जाते. स्वतःच्या छिद्र पडलेल्या लुगडयापेक्षा छपराचे छिद्र तिला महत्वाचे वाटतात. लोकांच्या वाईट नजरा फाटल्या लुगडयाकडे जातात याचे भानहीतिलानसते. म्हणूनच कवि महमुद सारंग म्हणात.

"यशात माझ्या अधिक वाटा तुझाच आहे,प्रघात हा नवीन नाही जुनाच आहे
खरेच वाटा तुझ्या नि माझ्या कुठे निराळया, म्हणून हा वाटतो बहाणा बराच आहे
घरास घरपण तुझ्यामुळे ग मिळून आले, तसाच अधिकार हा तुझा ग खराच आहे"

पत्नीबद्दलची ही भावना पुरुषाच्या जीवनातील पत्नीचे स्थान किती व कसे महत्वायाचे आहे हे व्यक्त करते. तर एक पत्नी पती बद्दल आपल्या मनातील हळूवारपणा व्यक्त करताना म्हणते.

"मी तुझ्या ओठात उरले अजून तुझ्या दृष्टीत ठरले, पाहिले ना मागे कधीही मी अशी आरशात उरले, मागे जो भोगला तो तुझाच प्यार होता, पिकल्या शेताचा तूच दावेदार होता" हे प्रेम, ही ओढ आणि जिव्हाळा प्रेमळ पतीमुळेच पत्नीच्या मनात निर्माण होत असते. पण कुठेतरी ठोका चुकतो आणि अंतरीचे दुःख व्यक्त होते.

"ठोका चुकला चुकले फेरे भविष्य होत जसे ठार
अशीच चुकले जराशी अशीच संपले जरा जराशी" (जुल्फी शेख, मी कोण?)

स्त्रीचे पूर्ण अस्तित्वच पुरुषापेक्षा भिन्न स्त्री असल्याची जाणीव पदोपदीतिला आनंद देते पण निराशा आली की दुःख ही देते म्हणूनच तिचे दुःख एका ठोकरानेही व्यक्त होते. अठ्ठावीस युगापासून स्त्रीत्वाची जाणीव एका शब्दाने वेदनारुप घेउन स्वतःचे अस्तित्व दुय्यम असल्याची जाणिव व्यक्त करते. जेव्हा ती नववधू. प्रिया असते तेव्हा तिच्या आनंद हा तिचा शब्दातून व्यक्त होते.

'आज अशा निवांतवेळी आरासीगीत तुझे गायिले.
ओल्या हळदीभरल्या क्षणांची मऊशार चिंब बरसात झाली" (जुल्फी शेख, अक्षरवेध)

स्त्रियांचे समार्थ्य पुरुषापेक्षा कितीतरी जास्त आहे, नवीन जग निर्माण करण्याची शक्ती फक्त स्त्रीयामध्ये आहे अशा वेळी जगभरल्या पुर्णतेत एक संग घेउन राहणेच अधिक चांगले अशी भाषा बोलणारी पत्नी कधी विद्राही रुप घेईल याचा नेम नाही म्हणून पत्नीला घरचे घरपण हवे असते. भाडेकरी नाव नाही.

याशिवाय सामान्य मराठी जीवन जगणे, सौभाग्याचे प्रतिक म्हणून मंगळसूत्र घालणे नऊवारी लुगडी, ओटी भरणे, लग्न समारंभातही मराठमोळया प्रथा पार पाडणे, मराठी सणवाार गणपती, नवरात्र, मंदिर, प्रसाद, हळदीकुंकू, गजरा या सर्वाचे स्थान मुस्लिम मराठी कवितेतील सामान्य पत्नीच्या जीवनात आहे.मुस्लिम धर्मात पूजा देवदेवता, मुर्तीपूजा, नवस हयाबाबी निसिध्द असूनही असे त्याचे अनेक दाखले आहेत. असे सामान्य मराठी कवितेसारखे चित्रण या कवितेत आहे. यानंतर मुस्लिम स्त्री, बुरखा पध्दती, मेहर,निकाह, हज या सर्वाचे चित्रण आलेले आहे. विशेषतः निकाह, तलाक आणि बुरखा याचे चित्रण मुस्लिम धर्मीय म्हणून आलेले आहे. पण बहूतांश सामान्य स्त्रीजीवनाचे चित्रणच जास्त आहे.

पत्नी नववधू यापूर्वीचे स्त्रीरुप म्हणजे मुलगी,तिला मुलापेक्षा कमी महत्व दुय्यम स्थान असले तरी या काव्यापंक्तीत मुलीबद्दल अत्यंत कोमल भावना व्यक्त घेउन आनंदा चा ठेवा म्हणजे मुलगी असे चित्रण आलेले आहे. लग्न सोहळयात मुलगी पारखी झाल्याची भावना आईवडिलांच्या मनात निर्माण होउन भविष्याची काळजीही व्यक्त होते.

"आईच्या डोळयात अश्रू,बाबांच मन भरलेलं
किलबिलणारा छोटा भाऊ,लग्नमंडपात अनेक पाहूणे
पानंवाढलेली एका बाजूला, मुले खेळती अंगणाबाहेर,
लग्नसोहळयात सारे मग्न, तुझ्या डोळयात आनंदाश्रू
तुळशीगत तू लहानाची मोठी, याच अंगणी झालीस खरी
पण सात फेऱ्याने आम्हा साऱ्यांना, या तुळशीला त्या भावला.
आई बाबांना पोरी तू परकी झालीस" (इकबाल मुकादम, माणसातला माणूस)

आई–वडिलांच्या सर्व भावनांचे केन्द्र असलेली मुलगी सासरी गेल्यावर परकी झाल्याची खंत वाटते तर काही कवितांमध्ये गरीबीची जाण नसलेल्या मुलीला वडीलांची समजावणी मनाला चटकालावून जाते.

"चालण्याचा हट्ट करु नकोस रखरखत्या उन्हात अनवानी पायातील गल्लीची हाक अधिकच बकाल असते,विटिया तुटक्या मोडक्या बाहुलीचे सौंदर्य, शाबूत असू दे, चालण्याचा हट्ट करु नकोस"

(जावेद कुरैशी–बएत)

परिस्थितीमुळे गांजलेल्या पित्याला आपल्या मुलीच्यातुटक्यामोडक्या बाहुलीचे जतन करण्याच्या काळजीसोबतच काचेच्या शोकेसमधील बाहुलीवर मुलीची नजर पडू नये याची काळजी वाहावी लागते. अशा मुलीची मागणी करताना इलाही जमादार म्हणतात,

"खणा नारळांनी आई तुझी भरली मी ओटीदेवी माई अंबाबाई कधी येथील तू पोटी"

मुलगी जन्माला यावी म्हणून मागणे मागणारी तर मुलीने जन्माला येताना काहीतरी घेऊन यावं अशी समाजाची अपेक्षा असते.

"मुलीच्या जन्माला यायचं होत तर सोबतीला रंगरुप आणयचं
बालपण हेच ऐकताना हरवल, वडिलांचे सदोदीत वटारलेलेडोळे
भावाचे धपाटे आणि आईच्या डोळयात तरळणारं पाणी
हया पलिकडं बघावं तर सर्वत्र सारखे. (महमूद सारंग, उजेडाच्या स्वागतासाठी)

सामान्य समाजाची मुलीबद्दची मानसिकता सौंदर्याला महत्व, भावाची भिती व भावापेक्षा मिळणारी वेगळी वागणूक हे पाहून आईला होणारे दुःख, स्वःकर्तृत्वाची उणीव अशा एक ना अनेक त्रासदायक गोष्टींना मुलीना सामोरे जावे लागते याशिवाय समाजकंटकाकडून होणारे अत्याचार याचीही दखल ही कविता होते.

"बेटी उद्या तू बुरख्यात गेली तरी
बिनबुरख्यात गेलीस तरीही
छेडतीलच तुला ते, कदाचित बलात्कारही करतील (एहतेशाम देशमुख, मुसलमन)

समाजिकता व्यक्त करणारी ही कविता राष्ट्रीय व धर्माच्या बाजूनेही आशय व्यक्त करते. या मुली बरोबरच सासरी गेलेल्या मुलीची माहेरची ओढ, माहेरची माणसे येतील म्हणून तीचे रस्त्याकडे लागलेले डाळे इकबाल मुकादम व्यक्त करतात.

"आई बाबा, नात्या गोत्यातील येउ–येउ म्हणणारी येतील आज.
साडी चोळीतील लेक पाहिली, दागदगिण्यात पाहतील आज
सदैव हसरा चेहरा पहिला मनातले अश्रू पाहतील आज" यासह सामान्य स्त्री आणि पौराणिक स्त्री यांचा परपरसंबंधही या काव्यप्रवाहात जोडला आहे. त्याला राजकीय राष्ट्रीय संदर्भ देताना जुल्फी शेख म्हणतात,

"वाटणीचे दुःख राधा रुक्मिनी होउनच भोगावे
पण रुक्मिणी झाडाचे राधाफुलांच्या भोगाचं काय"?

किंवा

आम्ही आहोत स्त्रीसत्व– आईसत्व
म्हणती मर्ढेकर–द्रोपदीचे सत्व माझया लाभू दे भाषा शरीरा
हे सत्व कोणते? पाच पतीची शय्या की
स्त्री कर्तव्य की आदिमता काय?"

स्त्री जातीत जन्म झाला असला तरी नवसृजन ही महत्वाची जबाबदारी आपल्यावर आहे. पुराणातील स्त्रियाही यापासून विभक्त नव्हत्या पण पुराण काळापासूनच स्त्रित्व, सतीत्व पणाला लावले जाते, तिथे भावना दुय्यम असते. स्त्रीयांचे सत्व आई म्हणून कसोटीला लागते पण मग या सर्वांचा अर्थ काय? आमच्या अशा जीवनाचा अर्थ पुरुषप्रधान समाज कसा लावतो. मर्ढेकरांनी द्रोपदीचे सत्व साहित्यकरीता मागितले पण कोणत्या अर्थाने? हा प्रश्न कवयित्रीला पडतो. मुस्लिम कवी इथल्या संस्कृतीत रममाण झाले असल्यामुळे त्यानी हिंदू महाकाव्य, पुराण, भगवद्गीताआत्मसात करुन सीता, कुंती, द्रोपदी, अहिल्या, गांधारी, राधा–रुक्मिणी यांचे जीवन व त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची दखल या कवितेत आहे.

"सीते काय करशील आता
सगळेच लक्ष्मण करता हेत तयारी
तुला विकण्याची रावणांना" (एहतेशाम देशमुख, मुसलमन)

चातुर्वर्ण व्यवस्थेने या पौराणिक स्त्रियांची अशी अवस्था केली आहे तेव्हा सामान्य स्त्रियांची काय मजाल अशा अर्थाचे अनेक प्रश्न ही कविता उपस्थित करते.पौराणिक स्त्रियांचा असा संदर्भ तर उपेक्षित स्त्री जीवनाची

हलाखिची दशा वाचकांचे मन व्यथित करते. निपुत्रिका, बलात्कारीत, घटस्फोटीता, वेश्या व्यवसायिक, उत्तान, श्रृंगारिक, रुढी परंपरांना बळी पडून वाममार्गी लागलेल्या स्त्रिया, त्यांचे हलाखिचे जीवन याचीही दखल मुस्लिम मराठी कवितेने घेतली आहे.

"हिरव्या मुली खिदळतात कापराचे डोळे पेटवत
विकिला उत्सुक सफरचंदागत बायका
सकाळीच उठून रात्रीची वाट बघतात
न् रात्री रात्रभर जागून.....
सगळ घडतय विसंगत न् मनाच्या बाहेरचं
शरीर मोडत जातं शांतपणे आवाज न करता
हिरव्या मुली अंगाची घडी करुन बंद होतात रात्री स्वतःत
घाबरुन गर्भाशय तपासत रात्री अपरात्री अजूनही" (मलिका अमरशेख, महानगर)

पुरुषाला पत्नी म्हणून हवं असत फक्त शरीर ते मग वेश्येचे किवा अजूनही उरलेल्या प्रेयसीचे. कधी टाईमपास तर कधी थोडा चेंज म्हणून, पण स्त्री एक स्वतंत्र अस्तित्व आहे याची जाणच त्यांना नसते किंवा असून आपले वर्चस्व कमी होईल या भितीने मान्य करत नाहीत.ही आजही स्थिती पण जर स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हतं तर झाशीची राणी तरी कशी झाली हा प्रश्न ही कविता उपस्थित करते.

"कोण म्हणतो स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते
मग कशी झाली झाशीची राणी
हा ही एक प्रश्न आहे की स्त्री मुक्ती चळवळीला
पण झाशीची राणी लढली ब्रिटिशांबरोबर" (बादशहा सैयद, सूचल्या)

असा प्रश्न स्त्रीवादी चळवळीच्या विचारांना कवीने विचारला आहे. तर अन्याय अत्याचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांना लक्ष्मणरेखा ओलाडू नये असा उपदेशही केला आहे.

अबला नव्हे तू सबला होती नीतीमत्तेची शक्ती तूच होती
कुमारी माता बनली तुझीच शक्ती, ।।
गात असतांना तुझीच महती, लक्ष्मणरेखा का उगीच ओलांडती
किंवा
बायकोची फॅशन नवऱ्याला व्यसन कुठवर पूरेल मासिक वेतन

स्त्रीने परंपरागत चौकट न नाकारता आपले स्थान जपावे, स्वतःची नितीमत्ता जोपासावी अन्यथा समाज स्त्रिला नकार देतो. कुटुंब चालवणे स्त्रीचा धर्म आहे तो तीने प्रेमाने पाळवा अशा अनेक समजूती या कवितेत आकार घेतात.

मलिका अमरशेख जुल्फी शेख यांनी पारंपारिक दुःख व्यक्त करुन त्यांना नकार देताना विद्रोहाची भाषा वापरली आहे.स्त्री फक्त भोगवस्तू अथवा दासी नसून संपूर्ण जविनाची सृजनशक्ती आहे. हुंडा किंवा वांझोटी म्हणून अत्याचाराला बळी पडणारी ती अबला नाही.

मी सृजन सत्याचे दुसरी दुःख संवेदना पीडेचे
मी महान प्रेरणा महान पुरुषार्थाची
दायित्व मी संवेदनी सत्याची
आई होउन मीच होते ना आकारी (जुल्फी शेख, मी कोण?)

स्त्री सर्व पिडा, दुःख, संवेदना सहन करुन जगातल्या महान पुरुषार्थाना प्रसवते. ही प्रसवक्षमता ईश्वराने आईरुपी स्त्रीला दिली आहे. तेव्हा या प्रसवपिडेच्या मोबदल्यात एवढीच अभिलाषा आहे की मी प्रसवलेला पुरुष स्वार्थी मानव नसावा तर नवचेतना असलेल्या मानव संस्कृतीला जन्म देणारा मानवमन असावा. तर मलिका अमरशेख आपल्या महानगरात या काव्यसंग्रहात म्हणतात, "शहरातल्या अन जगातल्या बायका विचारात पडलेल्या असंचित्र आवडणार नाही कुणालाच, त्या एकतर प्रियकराच्या बाहुपाशात असतात किंवा व्हिनसची असहाय हात तोडलेली नग्न सुंदरी असतात, ही चिंता बदलण्याचा या बायकांना हक्क दिला नाही कुणीच, न अशामूळं बायका शहरातल्या न जगातल्या हळूहळू अवकाशात जाउ लागल्यात"

अशी खंत ही कविता व्यक्त करते, अशा विविधांगी स्वरुपात मुस्लिम मराठी काव्यप्रवाहातून स्त्रिचित्रण, स्त्री–वेदना, स्त्री–जीवन आईपत्नी, मुलगीप्रेयसी या अंगातून आलेले आहे. धार्मिक, पौराणिक, सामाजिक,

हलाखिची दशा वाचकांचे मन व्यथित करते. निपुत्रिका, बलात्कारीत, घटस्फोटीता, वेश्या व्यवसायिक, उत्तान, श्रृंगारिक, रुढी परंपरांना बळी पडून वाममार्गी लागलेल्या स्त्रिया, त्यांचे हलाखिचे जीवन याचीही दखल मुस्लिम मराठी कवितेने घेतली आहे.

''हिरव्या मुली खिदळतात कापराचे डोळे पेटवत
विकिला उत्सुक सफरचंदागत बायका
सकाळीच उठून रात्रीची वाट बघतात
न् रात्री रात्रभर जागून.....
सगळ घडतय विसंगत न् मनाच्या बाहेरचं
शरीर मोडत जातं शांतपणे आवाज न करता
हिरव्या मुली अंगाची घडी करुन बंद होतात रात्री स्वत:त
घाबरुन गर्भाशय तपासत रात्री अपरात्री अजूनही'' (मलिका अमरशेख, महानगर)

पुरुषाला पत्नी म्हणून हवं असत फक्त शरीर ते मग वेश्येचे किवा अजूनही उरलेल्या प्रेयसीचे. कधी टाईमपास तर कधी थोडा चेंज म्हणून, पण स्त्री एक स्वतंत्र अस्तित्व आहे याची जाणच त्यांना नसते किंवा असून आपले वर्चस्व कमी होईल या भितीने मान्य करत नाहीत.ही आजही स्थिती पण जर स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हतं तर झाशीची राणी तरी कशी झाली हा प्रश्न ही कविता उपस्थित करते.

''कोण म्हणतो स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते
मग कशी झाली झाशीची राणी
हा ही एक प्रश्न आहे की स्त्री मुक्ती चळवळीला
पण झाशीची राणी लढली ब्रिटिशांबरोबर'' (बादशहा सैयद, सूचल्या)

असा प्रश्न स्त्रीवादी चळवळीच्या विचारांना कवीने विचारला आहे. तर अन्याय अत्माचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांना लक्ष्मणरेखा ओलाडू नये असा उपदेशही केला आहे.

अबला नव्हे तू सबला होती नीतीमत्तेची शक्ती तूच होती
कुमारी माता बनली तुझीच शक्ती, ।।
गात असतांना तुझीच महती, लक्ष्मणरेखा का उगीच ओलांडती
किंवा
बायकोची फॅशन नवऱ्याला व्यसन कुठवर पूरेल मासिक वेतन

स्त्रीने परंपरागत चौकट न नाकारता आपले स्थान जपावे, स्वत:ची नितीमत्ता जोपासावी अन्यथा समाज स्त्रिला नकार देतो. कुटुंब चालवणे स्त्रीचा धर्म आहे तो तीने प्रेमाने पाळवा अशा अनेक समजूती या कवितेत आकार घेतात.

मलिका अमरशेख जुल्फी शेख यांनी पारंपारिक दु:ख व्यक्त करुन त्यांना नकार देताना विद्रोहाची भाषा वापरली आहे.स्त्री फक्त भोगवस्तू अथवा दासी नसून संपूर्ण जविनाची सृजनशक्ती आहे. हुंडा किंवा वांझोटी म्हणून अत्याचाराला बळी पडणारी ती अबला नाही.

मी सृजन सत्याचे दुसरी दु:ख संवेदना पीडेचे
मी महान प्रेरणा महान पुरुषार्थाची
दायित्व मी संवेदनी सत्याची
आई होउन मीच होते ना आकारी (जुल्फी शेख, मी कोण?)

स्त्री सर्व पिडा, दु:ख, संवेदना सहन करुन जगातल्या महान पुरुषार्थांना प्रसवते. ही प्रसवक्षमता ईश्वराने आईरुपी स्त्रीला दिली आहे. तेव्हा या प्रसवपिडेच्या मोबदल्यात एवढीच अभिलाषा आहे की मी प्रसवलेला पुरुष स्वार्थी मानव नसावा तर नवचेतना असलेल्या मानव संस्कृतीला जन्म देणारा मानवमन असावा. तर मलिका अमरशेख आपल्या महानगरात या काव्यसंग्रहात म्हणतात, ''शहरातल्या अन जगातल्या बायका विचारात पडलेल्या असंचित्र आवडणार नाही कुणालाच, त्या एकतर प्रियकराच्या बाहुपाशात असतात किंवा व्हिनसची असहाय हात तोडलेली नग्न सुंदरी असतात, ही चिंता बदलण्याचा या बायकांना हक्क दिला नाही कुणीच, न अशामूळं बायका शहरातल्या न जगातल्या हळूहळू अवकाशात जाउ लागल्यात''

अशी खंत ही कविता व्यक्त करते, अशा विविधांगी स्वरुपात मुस्लिम मराठी काव्यप्रवाहातून स्त्रिचित्रण, स्त्री–वेदना, स्त्री–जीवन आईपत्नी, मुलगीप्रेयसी या अंगातून आलेले आहे. धार्मिक, पौराणिक, सामाजिक,

सांस्कृतिक, राष्ट्रीय घटकानेही स्त्रीचित्रणाला स्पर्श केला आहे. सामान्य स्त्री जीवनाचे हे चित्रण मुस्लिम स्त्री–जीवनापेक्षा वेगळे असले तरी स्त्री म्हणून जे भोग, वेदना वाटयाला येते ती मात्र सारखीच आहे. मुस्लिम स्त्री ही काही बाबतीत अत्यंत कमनशीबी आहे त्याचेही चित्रण या काव्यप्रवाहात आहे. या लेखात ही चर्चा केलेली नाही त्यासाठी स्वतंत्र असा लेख लिहावा लागेल असो.

## सारांश :–

एकंदरीत मुस्लिम मराठी कवितेने वयक्तिक अनुभवानुसार स्त्रियांच्या वर्तनाचा अर्थ लावून त्या आधारावर स्त्रीवादी काव्यरचना केलेली आहे. स्त्रियांच्या सर्वांगिण जीवनाचा विचार करुन या कविता आल्या आहेत असे अभ्यासांती वाटते. शब्बीर मुलाणी यांनी आदर्श नारी, प्रेमळ मुलगी, सासुरवाशीन नववधू,सीता राणी लक्ष्मीबाई, जिजामाता यांचे आदर्श समोर ठेवून तसेच उदाहरणासह चित्रण केले आहे. मंसूर एजाज जोश यांनी आईच महत्व, तिचे व्यक्तीमत्व अधू डोळयांना दृष्टी देवयाइतपत सात्विकअसते असे प्रतिपादन केले आहे. इलाही जमादारांनी कमलपुष्पासारखी जोपासणा करणारी प्रसंगी खस्ता खाणारी आई,पत्नी यांचे चित्रण केले आहे. तशी त्यांच्या कवितेतील प्रेयसीही अत्यंत भावमधूर आहे पण प्रसंगी काळीजकुरतडणारीही आहे. इरफान शेख, फ.म. शहाजिंदे एहतेशाम देशमुख, जावेद कुरेशी, इकबाल मुकादम, जहीर शेख, महमूद सारंग, यांच्या कवितांमधील स्त्री सामान्य आहे. कधी ती आई, कधी पत्नी तर कधी मुलगी बनून कवितारुप घेते. कोवळे पाषण, निधर्मी, मुसलमन बएत, नदी, माणसातला माणूस, नर्सिसस, उजेडाच्या स्वागतासाठी, वाटसरु, प्रलय, चावडी, मुक्तछंद या विविध काव्यसंग्रहातील स्त्रीचित्रण काही अपवाद वगळता सामान्य स्त्रीचित्रण आहे.

जुल्फी शेख आणि मलिका अमरशेख यांच्या कवितेतील स्त्री वेगळया स्वरुपात अवतरली आहे. जुल्फी शेख याच्या 'अक्षरवेध' या काव्यसंग्रहातील स्त्री ही प्रेमळ पत्नी, प्रेयसीचे रुप घेउन कोमल भाव व्यक्त करणारी आहे. पण 'मी कोण' या काव्य संग्रहात मात्र ही स्त्री मी कोण? हा प्रश्न उपस्थित करुन विश्वात्मक झाली आहे. या काव्यसंग्रहातील स्त्रीवाद स्त्रीयांच्या मातृत्वापासून राष्ट्रीयत्व, वैश्विकता, विभाजन, जागतिकीकरण, भारत–पाक पाळणी, आत्मतेचा शोध, स्त्री म्हणून स्त्रियांचे प्रश्न, दुःख या सर्वाचे चित्रण त्यांच्या कवितेत आहे. मी कोण मी LOC- Line & Control असे त्या पहिल्या कविते मान्य करतात, हे मान्य करणे स्त्री म्हणून लक्ष्मणरेखा, मुस्लिम म्हणून फाळणीची सिमारेषा? की बुरखापध्दती, का? असे अनेक प्रश्न पहिल्या कवितेतील पहिल्या ओळीतच मनात घर करतात. मालिका अमरशेख शाहीर अमरशेख यांच्या कन्या आणि नामदेव ढसाळ यांच्या पत्नी होत. त्यांचे 'वाळूचा प्रियकर', 'महानगर', 'देहश्रुतू' 'माणूसपणाचे भिंग बदल्यावर' असे चार काव्यसंग्रह प्रकाशीत आहेत. या काव्यसंगृहातील कवितांमधून त्यांनी स्त्रीजीवनांचे असे चित्रण केले आहे. स्त्रियांच्या शारिरीकतेमुळे त्यांची होणारी अवस्था यांच्या बारकाव्यासहीत दखल घेउन विद्रोहात्मक विचार त्यांच्या कवितांमध्ये आहे. ''एक पूर्ण स्त्री गर्भाशयासकट, एक पूर्ण पावसाळा एक पूर्ण ग्रीष्म एक आभाळ आणि एक किनारा, तिच्या छातीत न मांडयात तुम्ही जगाचे अर्थ, शोधता किंवा तुमच्या प्रश्नांची उत्तरं''

अशा परखड़तेने खडसावून प्रत्येक पुरुषाला स्त्रीचं पांघरुण घेण आवश्यक आहे असे ठामपणे सांगते. महानगरीय जीवनात विद्रूप झालेले स्त्रीजीवन त्यांच्या कवितांमधून प्रकट होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय समाज विकासाकडे वाटचाल करत असूनही अजूनही ख–या अर्थाने स्त्री स्वातंत्र्य मिळालेच नाही. तिच्या अस्तित्वाचा प्रश्न समाज नकाराच्याच पातळीवरघेतो. मातृत्व, वात्सल्य या भावनेमुळे तिचे प्रत्येक क्षेत्रांत खच्चीकरण केले जाते. महत्वाचे म्हणजे मुलगी, बहीण, सहकर्मचारी यांच्या बाबतीतला उदारमतवादी पुरुष पत्नीच्या बाबतीत इतका उदासीन कसा, तिचा अधिकार, तिचे स्वातंत्र्य तिचे अस्तित्व तो का नाकारतो हा प्रश्न ही कविता उपस्थित करते. प्रेमभरीत झालेला पुरुषप्रधान समाज पत्नीच्या बाबतीत असा रानटी का वागतो हा एक प्रश्न कवितांमधून उपस्थित होतो.

## निष्कर्ष :–

१) आईच्या ममतेने व मुलीच्या वात्सल्याने मुस्लिम मराठी काव्यातील स्त्रीचित्रणात संपूर्ण स्त्रीजातीच्या जीवनाचा विचार करुन त्यांच्या समस्या, त्यांचे अस्तित्व, मानसिकता यांचा विचार केलेला आहे.

२) मुस्लिम मराठी कवितेत आईच्या भावनांशी एकरुप होऊन तिची महती सांगणा–या कविता भरपूर आहेत.

३) कवी शब्बीर मुलाणी, जावेद कुरैशी, एहतेशाम देशमुख, सैयद अल्लाउद्दीन, इकबाल मुकादम, अजीज नदाफ, इलाही जमादार जहीर शेख, बादशहा सारंग एस. एन. पठाण, रब्बानी शेख, बादशहा सैयद, शफीक शेख, जुल्फी शेख, मलिका अमरशेख, या कवीच्या कवितेतील स्त्री चित्रण विविधांगी असून स्त्रीमनाचा विचार केलेला आहे.

४) मलिका अमरशेख यांनी आपल्या कवितेतून बिछान्यातील स्त्रियांचे पुरुषी जीवनातील नाकारलेल्या अस्तित्वाची जाणीव अत्यंत तीव्र स्वरुपात आहे. त्यांच्या 'महानगर' देहऋतू या काव्यसंग्रहातील स्त्री पुरुषप्रधान समाज–व्यवस्थेतील नाकारलेली स्त्री आहे. महानगरात संपूर्ण जिवन बदलते मात्र स्त्रीयांचं जग बदलत नाही ही वेदना आहे.

५)जुल्फी शेख यांच्या कवितेतील स्त्री ही सामान्य पण जागतिक आहे. तिला पती प्रियकराच्या सहवासासह जागतिक घडमोडींची जाण आहे. ती जाणीव कवितेत समर्थपणे व्यक्त होते 'मी कोण' हा जुल्फी शेख यांचा काव्यसंग्रह अशा विविध स्त्री दर्शनासह आकाराला आला आहे.

६) सामान्यतः या कवितांमध्ये स्त्रीने घर मातृत्व साभांळून विविध क्षेत्रात पदार्पण करुन कर्तृत्व गाजवावे व आपला भविष्यकाळ सुखद करावा असा आशावाद व्यक्त केला आहे.

७) आधुनिकीकरणाकडे चाललेला देश, समाज आजही स्त्रियांच्या बाबत रानटीच आहे ही खंत कविता व्यक्त करते.

संदर्भ :–


१. शब्बीर मुलाणी, चावडी, मृदगंधा प्रकाशन, पुणे १९९७
२. जुल्फी शेख, मी कोण? युगासंवाद प्रकाशन नागपूर.
३. जुल्फी शेख, अक्षरवेध, जुल्फी प्रकाशन, नागपूर १९९०.
४. जावेद कुरैशी, बएन युगसंवाद प्रकाशन, नागपूर १९९७.
५. एहतेशाम देशमुख, मुसलमन, टोव पब्लीकेशन, जळगांव, २००१.
६. मंसूर एजाज जोश, जेरबंद, आंबेडकर साहित्य प्रबोधीनी, चंद्रपूर २००३.
७. इरफान शेख, कोवळे पाषाण, शब्दगंधा प्रकाशन, चंद्रपूर, २००३.
८. फ.म. शहाजिंदे, निधर्मी, आंतरभारती प्रकाशन, औरंद शहाजनी, १९९७.
९. जहीर शेख, नर्सिसस, जाणीव प्रकाशन, वाशी.
१०. मलिका अमरशेख, महानगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधीनी, मुंबई १९९९.
११. महमुद सारंग, उजेडाच्या स्वांगतासाठी, मीनल प्रकाशन, ठाणे, २००१.
१२. बादशहा सैयद सुचल्या, संपादक नवजीवन, प्रींटींग प्रेस, पुणे.
१३. इलाही जमादार, जखमा अशा सुंगधी, अनिता प्रकाशन, मल्कापूर, २००५ च.आ.


❖❖❖

Volume-2 (2021)
Issue-1 (January-2021)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal

# राष्ट्रीय दृष्टिकोनातून मुस्लिम मराठी काव्याचे विवेचन

**डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज**
मराठी विभाग प्रमुख
एस.एस.गर्ल्स कॉलेज, गोंदिया ४४१६०१
9284763884
Email : parthkavita@gamil.com

---

## प्रस्तावना

राष्ट्र ही राजकीय संकल्पना असली तरी राष्ट्र तयार होण्याकरिता भावनिक ऐक्य अत्यावश्यक असते. भारतात भावनिक ऐक्य निर्माण झाल्यामुळेच इंग्रजांपासून स्वातंत्र्य हिरावून घेता आले. विशिष्ट भूमी आणि त्या भूमीवर वास्तव्य करणारे लोक यांच्यात भावनिक एकात्मता जेव्हा जेव्हा प्रखरतेने उफाळून येते तेव्हा तेव्हा राष्ट्र ही संकल्पना भक्कम होऊन राष्ट्रभक्ती उदयाला येते वत्या राष्ट्रभक्तीतूनच राष्ट्रवाद उदयाला येतो. आपल्या भूमीवर वास्तव्य करणाऱ्या लोकांबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली की राष्ट्र आणि ही भावना राष्ट्रीयतेशी जोडली गेली की राष्ट्रवाद निर्माण होतो. हीच राष्ट्रभक्ती–देशभक्ती होय. मराठीच्या प्रत्येक साहित्य प्रवाहात राष्ट्रभक्तीचे वर्णन, चित्रण विविधांगी रूपात साकार झाले आहे. अगदी संत साहित्यापासून तर आजतागायत ही परंपरा सुरू आहे. स्वातंत्र्यप्राप्तीकाळात तर देशभक्तीपर साहित्य संपदेची भरभराट झालेली असून स्वातंत्र्यभावना प्रज्वलित करण्याकरिता सहायक ठरली आहे. मुस्लिम मराठी साहित्य प्रवाहसुद्धा या परंपरेपासून वंचित राहिला नाही. अगदी मुस्लिम मराठी संतकवितेतही देशभक्तीची कितीतरी उदाहरणे आलेली आहेत. त्यांच्या हिंदू–मुस्लिम ऐक्याच्या पंक्तीतून राष्ट्रभक्तीचे दर्शन घडते.

''शाह मुतबजी ब्रम्हणी ।
जिन्मे नही मनमानी।
पंचीकरण का खोज किये ।
हिंदू–मुसलमान एक कर दिये।''

असे शाह मुंतोजी ब्राम्हणी म्हणतात,

आधुनिक मुस्लिम मराठी काव्यप्रवाहात देशभक्तीपर अनेक कविता निर्माण झाल्या आहेत. शाहिर अमरशेख, अजीज नदाफ, फ.म.शहाजिंदे, अे.के.शेख, कलीम खान, इकबाल मुकादम, जुल्फी शेख, हबीब भंडारे, एहतेशाम देशमुख, जावेद पाशा, कुरैशी, मिर्झा रफी अहमद बेग यांनी देशाच्या तत्कालीन राजकीय स्थितीचे विश्लेषण करून समकालीन वास्तवदर्शी देशभक्तीचे चित्रण केले आहे.

१९३५ मध्ये सय्यद अमीन यांनी मुस्लिम मराठी साहित्य हे संबोधन प्रथमत: वापरले आणि मुस्लिम धर्मीय लेखक कवींचे मराठी लेखन मुस्लिम मराठी साहित्यात जमा होऊन एक नवा समृद्ध असा साहित्यप्रवाह निर्माण झाला. या साहित्यप्रवाहाने कथा, कविता, कांदबरी, नाटक, वैचारिक लेख, आत्मचरित्र, ललित लेखन अशा सर्व साहित्यप्रकारात भरपूर लेखन केले आहे. यातही काव्याचा ओघ मोठा असून यात जीवनाच्या सर्व अंगांचे वैचारिक दृष्टीने, भावनिक तळमळीने चित्रण आलेले आहे. निसर्गमयता, प्रेमभावना, आत्मनिवेदनपर, सामाजिक दर्शन, स्त्रीवादी, आध्यात्मिकता, धार्मिकता या सर्वांच्या वैविध्य दर्शनासोबतच

देशभक्तीचेही उत्कट वर्णन या कवितांमध्ये आहे. राष्ट्रभक्ती, देशभक्तीपर कवितांसोबत वेदनेच्या कविताही भरपूर आहेत.

**राष्ट्रभक्तीपर कविता**

''सर्वांतरी अेकात्मता वेषातूनी जरी भिन्नता
वैशिष्ट्य ते वेगळे, साधू अनेकातूनी एकता
हिंदू, मुलसमॉ, इसाई खरे अेकाच आईची लेकरे
सुख दुख आमचे नसे वेगळे
एकास काटा दुजा खिन्नता, सर्वांतरी एकात्मता

(अे.के.शेख, जुलुस माझा)

भारत देशात धर्म, प्रांत, भाषा, वेश–भूषा, परंपरा, रूढी–चालीरीती या सर्व विभिन्न असून वेगळ्या वैशिष्ट्यांसह एकत्र नांदत आहेत. कितीही वेगळेपणा असला तरी जगात वंदनीय अशी भारतभूमी एकाच धाग्याने विणलेली आहे. या एक धाग्याची अखंडता टिकवणे हेच आमचे कर्तव्य आहे. ''जगा वंद्य भारतभू अमुची कालही होती आज आहे, अंखडता टिकवा देशाची भारतभूमीवर चढवा साज, स्वातंत्र्याची शपथ तुला रे घेण्यापेक्षा दाता हो । माणसा माणसा जागा हो देशाचा एक धागा हो।

(अे.के.शेख, जुलुस माझा)

देशाची एकात्मता टिकविण्याकरिता स्वतःच धागा बनावे असे कवीला वाटते. संपूर्ण भारतीय भाऊबधांसारखे राहावेत हाच संदेश महामानवांनी दिलेला आहे. त्या संदेशावर जीवन जगू तर संपूर्ण जगामध्ये भारताला महान असे स्थान प्राप्त होईल. भारताची प्रतिमा उंचावेल.

''हिंदु, मुस्लिम, सिख, इसाई मिळू राहू सारे भाऊ भाऊ।
नांदो शांती सदा या देशात बापु
नेहरू आझादांचा आहे हा संदेश मंदिर, चर्च, गुरूद्वारा सर्वांचे आहे हे श्रद्धा स्थान ।
विषमतेच्या भेदभावाला विसरून जाऊ पंथ प्रांताला,
विदेशाला शिकऊ पाठ आम्ही बनवू भारत महान''

(सय्यद जब्बार पटेल, एकात्मता)

समाज धर्म, बंधन न पाळता सर्व धार्मिक स्थळांना श्रद्धास्थान समजून विषमतेच्या भेदभावाला विसरणे गरजेचे आहे. अशीच विषमता नष्ट करत गेलो तर आपल्या भूमीवर पुन्हा महामानवांना अवतार घ्यावा लागेल असा आशावाद कलीम खान व्यक्त करतात. ''जय भारती ! जय भारती ! स्वीकार माझी आरती श्रीकृष्ण, नानक, बुद्ध अन् ख्वाजा तुका अवतरती'' देशावर प्रेम असणे, देशाप्रती बांधिलकी असणे, वंदनीय अशा नजरेतून भारतभूमीची आरती ओवाळणे ही सहजभावना या काव्यप्रवाहातून प्रगट झाली आहे.

मीच दिल्ली, मीच केरळ, मीच हिंदूस्थान आहे!
मरणही माझे भुईला, कुंकवाचे दान आहे!
बाबरी मस्जिद असो वा, जन्म भू पुरूषोत्तमाची,
माझियासाठी अयोध्या आदराचे स्थान आहे.

(कलीम खान, कलीमच्या कविता)

राष्ट्रवादी मनोवृत्तीच्या या कविता देशाबद्दलचा प्रखर राष्ट्रवाद प्रगट करतात. देशनिष्ठा व्यक्त करणाऱ्या कवितांसोबतच तत्कालीन राजकारण, भ्रष्टाचार, देशातील अराजकता यावर प्रखर टिका करणारी, देश विभाजनामुळे तीव्र वेदना विद्रोहाच्या स्वरूपात व्यक्त करणारी राष्ट्रवादी कविता या काव्यप्रवाहात मोठ्या प्रमाणात आहे. १४ ऑगस्ट १९४७ ला देशाची फाळणी झाली. पाकिस्तान असे स्वतंत्र अस्तित्व घेऊन भारताचेच नवे रूप उदयाला आले. मुस्लिम धर्मीयांसाठी वेगळ्या प्रांताची योजना अंमलात आणली पण त्यामुळे मने विभागली गेली, धर्मद्वेषाने विद्रोही बनली. त्याला कारणही तसेच घडले, भारतातील मुस्लिमांनी पाकिस्तानात जावे आणि पाकिस्तानातील हिंदूनी भारतात यावे ही प्रक्रिया अत्यंत वेदनादायक होती. यात झालेला नरसंहार, जाळपोळ याने कितीतरी सामान्य निधर्मी कुटुंब नष्ट झाले. मुस्लिम जातीयतेचा प्रश्न अधिकाधिक तीव्र झाला. तरीही

''मी पुत्र भारतभूचा, संताच्या या भूमीचा, ज्ञानदेवांच्या वातीचा, दिव्यातल्या मातीचा
मी मलाच अगोदर घडवणार, भारत मातेशी नाते जुळवणार.

हजार (हबीब भंडारे)

१५ वर्षापूर्वीच्या भारतीय वंशाच्या मुस्लिमांना पुन्हा भारत मातेशी नाळ जुळवावी लागत आहे ही शोकांतिका आहे. अशा वेळी काय करायचे तर,

''या मित्रांनो एकत्र या या एका नव्या युगाच्या प्रारंभासाठी
जातपात–धर्मवाद–आतंकवाद या सऱ्यांनी बुररसटलेल्या युगाला शतकोशतके मागे करण्यासाठी,
नव्या सोनेरी सूर्याच्या प्रकाशासाठी आम्हाला तुम्हाला
एकच गरज–शांती–सदाचार–प्रेम आपुलकी.''

(इरफान शेख, कोवळे पाषाण)

असा प्रयत्न संपूर्ण भारतवासियांनी केला तर भारताला जगाच्या नकाशावर भारताला सशक्त रूप येइल, पण त्यापूर्वी आपसातील धर्मद्वेषी, जातद्वेषी भावना नष्ट करण्याकरिता स्वत:ला फक्त आणि फक्त भारतवासी समजून आचरण करावे लागेल. जागतिकीकरणाच्या या युगात अनेक देश महासत्ता होऊ पाहत आहेत आणि आपण धर्म, वंश, जात–पात या मुद्द्यांना धरून भांडत राहिलो तर मागे पडू. आपण भारत भूमीचे वारस आहोत आणि आज भारत मातेची अवस्था आपल्यामुळे, तत्कालीन राजकीय पुढाऱ्यांमुळे, सत्तापिपासू भ्रष्टाचारी समुदायामुळे जखडली गेली आहे तिला मुक्त करणे आपले कर्तव्य आहे.

''जखडली ही देशद्रोह्यांनी भारतमाता उठा उठा देशबांधवांनो पूरे झाली झोपा आता
जागो जागी बंदुकधारी वैफल्याची अजब कहाणी कसे कळेना जनतेचा हे उघडे डोळे तरी झोपले.''

(इकबाल मुकादम, माणसातला माणूस)

पारतंत्र्यातून भारतमातेला मुक्त करणे ही स्वातंत्र्यवीरांची पुण्याई होती. त्यांचे बलिदान फळाला आले. पण आता स्व स्वार्थापोटी स्वतंत्र मातेच्या पुत्रांनीच तिला अनेक बंधनात जखडलेले आहे. आपल्याच आईला बंधनात जखडणारे हे देशद्रोही आहेत. जेव्हापर्यंत सामान्य जनता जागृत होत नाही तेव्हापर्यंत देशद्रोह्यांना नेस्तनाबूत करता येणार नाही. त्याकरिता आपण जागृत असणे अत्यंत आवश्यक आहे. पारंपरिक व्यवसायासारखे राजकारणही आज परंपरागत व्यवसाय बनल्याचे दिसून येत आहे. भारतीय लोकशाही ही या व्यवसायाचे भांडवल आहे.

''बाप होता भ्रष्टाचारी, पोरगाही त्या वाटेवरी
लोकशाहीचा हद्द केला काय होती चुक सांगा
वाटले नव्हते जाऊ अग्नितून फुफाट्यावरी
लोकशाही वाटली तुम्हा बापजाद्याची कमाई
गरीबांचा घास तिजोरीत तळघरी
भ्रष्टाचाराचाही गौरवाने बांधतील मनोरा
दिल्लीत दिसेल कळस, गल्लीत पहा पायरी''

(सय्यद अल्लाउद्दीन, झिंदाबाद मुर्दाबाद)

भारतातील निवडणुका आणि स्वातंत्र्याप्राप्तीनंतरची मागील सहा दशकातील लोकशाही राज्यपद्धती विचारशून्य, तत्त्वशून्य, नीतीशून्य, पद्धतीने चालवली जात आहे. नेत्यांचे वशंजच पुढचे नेते बनत आहेत. हे नेते फुले, गांधी, आंबेडकर यांच्या पक्तीतले नाहीतच पण माणूसपणाच्या सामान्य पातळीपासूनही दूर आहेत. सत्तालोलूप राजकारणी नेत्यांची पिढी दर पिढी वाढच होत आहे. त्यामुळे भारतीय लोकशाही धोक्यात आहे. नेत्यांच्या भ्रष्टाचारामुळे सामान्य नागरिकही स्वार्थी, भ्रष्ट झाला आहे. अशा भारताची अवस्था सांगताना फ.म.शहाजिंदे म्हणतात, ''मातीची खेळणी, मातीशी जेव्हा बेईमान होतात, तेव्हा प्रजासत्ताक झोपत झोपत चालत असतो'' अशा प्रजासत्ताक समाजामध्ये कोणाचेही कोणावर नियंत्रण नसते. जो तो आपल्या स्वार्थाची खळगी भरायचा प्रयत्न करतो, कधी धर्माच्या, जातीच्या, आरक्षणाच्या नामांतराच्या, मंदिराच्या नावावर स्वत:चे व्यक्तित्व बळकट करून सत्ता काबीज करतो. अशा लोकशाहीचे कोणतेही मूल्य तिथे जोपासले जात नाही. तेव्हा भारत हा सर्वासाठी खुल्या असलेल्या सराय सारखा झाला आहे.

यारे, कुणीही या रे, वाटेल ते करा रे, हिंदोस्तान झाला उघडी सराय आता
या कुणीही आपल्या भाकरी भाजून घ्या, लोकशाहीचे इथे सरण आहे पेटले.''

(कलीम खान, कलीमच्या कविता)

वर्तमान काळातील शासनाची अवस्था पाहता असे लक्षात येते की स्वार्थी नेते देशहित न साधता स्व हिताकरिता विविध मार्गाने देशाला डबघाईला नेत आहे. अनेक विदेशी कंपन्यांना आमंत्रण देत आहेत. विजेसारखी रोजच्या गरजेची बाबही एनरॉनसारख्या विदेशांना सोपवली. अशा अवस्थेत देशाची अर्थव्यवस्था कुमकुवत होऊन विदेशांकडे अपेक्षेच्या दृष्टीने पाहावे लागते. जागतिक बॅंकेचे कर्ज दिवसेंदिवस वाढत असून आपण विश्वकर्जात बुडत आहेत याचेही भान सत्ताधाऱ्यांना नाही.

देशास छेडती हे घेऊन टाकू कर्ज
वर्ल्ड बॅंक देण्यास आहेच अर्जमंद
हे देशभाई कसले आहेत देश नासी
गेल्या पिढीत तुमचे अन प्रत्येक मूल माझे
नव नात्याने होते मी अशी विश्वकर्ज भाई....
ऋणातून जगाच्या व्हावा हा देश मुक्त सांगू नकोस आता मीही रचेन अस्तित्वयुक्त.....
पण पुढच्या युगात मी तर होईन कर्जमुक्त. (जुल्फी शेख, मी कोण ?)

तत्कालीन परिस्थितीचा गंभीर परिणाम जुल्फी शेख यांनी सांगितला. सारे जग ऐश आरामात असता आपण मात्र विश्व बँकातून कर्ज घेऊन पुन्हा पारतंत्र्यात जगल्यासारखे जगाच्या कर्जात राहत आहोत, पण कधी ना कधी हा देश कर्जमुक्त होईल. असा आशावाद व्यक्त करताना "पुन्हा तिरंगी झेंड्यातील गोल चक्रात आपले अस्तित्व शोधता शोधता आवाज अंतरीचा हिंदोस्तॉंच आहे असा कबूलीजबाब देणारी मुस्लिम मराठी कविता देशप्रेम, देशभक्तीची ग्वाही देते.

**समारोप**

मुस्लिम मराठी काव्यप्रवाहातील देशभक्ती, देशनिष्ठा व्यक्त करणाऱ्या कविता देशाची एकात्मता राष्ट्रीय आपुलकी यांचे चित्रण उत्कट व प्रेमळपणे करते. भारत जगातील महत्त्वाचे आणि सशक्त राष्ट्र म्हणून उदयाला यावे याकरिता प्रत्येक जंणानी महापुरूषांचा आदर्श आपल्या नजरेसमोर ठेवून कर्तव्य पार पाडावे, देशप्रेमापोटी आपल्या स्वार्थाला दूर ठेवून देशनिष्ठा जोपासावी असा संदेश ही कविता देते. अे.के. शेख, कलीम खान, एहतेशाम देशमुख, जुल्फी शेख, सय्यद अल्लाउद्दीन, जावेद पाशा, कुरैशी, अजीज नदाफ, इरफान शेख, इकबाल मुकादम यांच्या कवितांमध्ये तीव्र राष्ट्रभक्ती व्यक्त होते. देशातील भ्रष्ट राजकारण, सत्तालोलूप नेते, भ्रष्टाचार अनैतिकता याबद्दल तिरस्कार व्यक्त होऊन संपूर्ण व्यवस्थाच बदलवण्याची तयारी या काव्यप्रवाहाने व्यक्त केली आहे. भारत पाकिस्तान फाळणीचे दुष्परिणाम अत्यंत भयंकर असून सामान्य मुस्लिम समाज भरडला जातो ही वेदना व्यक्त होऊनही देशाबद्दलचा द्रोह व्यक्त न होता तत्कालीन राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि द्वेषी धार्मिकता याबद्दल संताप व्यक्त होऊन विद्रोही अभिव्यक्ति या कवितेत आली आहे.

**निष्कर्ष**

१) भारत ही मातृभूमी असून धर्मनिरपेक्षता हे भारताचे वैशिष्ट्य आहे. आपण ही जात, पंथ, धर्म विसरून भारतमातेला वंदनीय मानले पाहिजे ही भावना मुस्लिम मराठी कविता व्यक्त करते.
२) सदाचार, प्रेम, शांतीचा संदेश मुस्लिम मराठी कविता देते.
३) तत्कालीन राजकारणाबद्दल तिरस्कार व्यक्त होऊन संपूर्ण व्यवस्था बदलण्याचा संदेशासोबतच बंधुभाव जोपासण्याचा आशय अनेक कवितांमधून आलेला आहे.
४) लोकशाही राज्यपद्धतीच्या दैन्यावस्थाचे चित्रण करून सामान्य जनतेने कधी ना कधी हे दृश्य बदलले जाईल असा आशावाद ही कविता व्यक्त करते.
५) देशात विदेशी संताच्या, कपन्यांच्या हस्तक्षेपाला मुस्लिम मराठी कविता विरोध करते.

**संदर्भ सूची**

१) अे.के.शेख, जुलूस माझा.
२) सय्यद जब्बार पटेल, एकात्मता, शब्दांगार प्रकाशन, हिंगोली, १९९४.
३) कलीम खान, कलीमच्या कविता, प्रगत प्रकाशन, आर्णि, यवतमाळ, २००४.
४) हबीब भंडारे यांच्या प्रकाशित कविता.
५) इरफान शेख, कोवळे पाषाण, शब्दगंधा प्रकाशन, चंद्रपूर, २००४.
६) इकबाल मुकादम, माणसातला माणूस, सुरभि प्रकाशन पुणे, १९९५.
७) सय्यद अल्लाउद्दीन, झिंदाबाद–मुर्दाबाद, दिलजान प्रकाशन, मुर्शदपूर, आष्टी.
८) जुल्फी शेख, मी कोण ? युगसंवाद प्रकाशन, नागपूर, २००१.